# कलाशिक्षण

## इयत्ता तिसरी

विनामूल्य वितरणासाठी



# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

मनोदर्पण (८४४८४४०६३२) ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास – २११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी– ४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १३.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**समग्र शिक्षा**



# कलाशिक्षण

## इयत्ता तिसरी





महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

सोबतच्या चौकटीतील Q.R.Code स्मार्टफोनवर द्वारे स्कॅन केल्यास आपणास डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक, श्राव्य आणि दृकश्राव्य स्वरूपातील अध्ययन – अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११००४

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**'कला शिक्षण' विषय समिती**

श्री. शशिकांत देशमुख, (अध्यक्ष)
श्री. शिवाजी हांडे (सदस्य)
श्री. गोरक्षनाथ आबुज (सदस्य)
श्री. श्रीकांत ढालकर (सदस्य)
श्रीमती पुनम भोपळे (सदस्य)
श्रीमती छाया माळवाळ (सदस्य)
श्रीमती स्नेहा गाडे (सदस्य)
डॉ. सुमेधा ठाकुर (निमंत्रित)
श्री. नंदकिशोर नगरकर (निमंत्रित)
श्रीमती मृगया मोरे (निमंत्रित)
श्री. अमोल जाधव (निमंत्रित)
श्री. नितिन महामुनी (निमंत्रित)
श्रीमती वृषाली लेले (निमंत्रित)
श्रीमती निताली हरगुडे (निमंत्रित)
श्री. ओंकार वैरागकर (निमंत्रित)
श्री. अमोल बोधे (निमंत्रित)
श्रीमती जुई देशिंगकर (निमंत्रित)
श्रीमती रश्मी जोशी (निमंत्रित)
डॉ. गीतांजली बोरूडे (अभ्यासक्रम समन्वयक)
डॉ. अजयकुमार लोळगे (सदस्य सचिव)

**समीक्षक**

श्री. प्रमोद कांबळे (गुणवत्ता परीक्षक)
ॲड. संदेश साखरे (विधीतज्ज्ञ)
प्रा. विलास पंडीत (CWSN तज्ज्ञ)

**संयोजन**

**डॉ. अजयकुमार लोळगे**
विशेषाधिकारी कार्यानुभव (वि. का.)
प्र. विशेषाधिकारी कला (वि. का.)
कार्यानुभव, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती :**
श्री. लक्ष्मीकांत काळे, श्रीमती प्राजक्ता केरकर, श्री. मनोहर बावीस्कर, श्रीमती प्राची पोतदार, श्री. सोहम ओतारी, श्री. अजय पराडकर

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :** ७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश :**

**मुद्रक :**

**निर्मिती**

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. संदीप अजगावकर**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई – २५

# भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

### भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

बालमित्रांनो,

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अनुसार ‘कलाशिक्षण’ या विषयाचे इयत्ता तिसरीचे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. तुमचे वय आणि अनुभव लक्षात घेऊन तयार केलेले हे पाठ्यपुस्तक अभ्यासताना तुम्हांला आनंद होईल.

तुम्हांला खेळायला, गाणी म्हणायला, चित्रे काढायला आणि रंगवायला, अभिनय करायला, नृत्य करायला आणि मातीपासून वस्तू तयार करायला आवडते, हो ना? ह्या सर्व गोष्टी तुम्हांला या पाठ्यपुस्तकातून करायला मिळणार आहेत. दृश्यकला, रंगमंच, संगीत आणि नृत्य या कलाप्रकारांतील सर्व उपक्रमांतून तुम्ही धमाल करणार आहात. तसेच तुमच्या या कलाप्रकारांचे छोटेसे सादरीकरणही करता येणार आहे. तयार केलेल्या काही वस्तू इतरांना भेटही देता येणार आहेत. त्यामुळे आनंद आणि शाबासकी तुम्हांला मिळणारच आहे. समृद्ध भारतीय परंपरेची छोटीशी ओळख कला संस्कृती या उपक्रमांतून होईल. चला तर मग कृतियुक्त अध्ययनाचा अनुभव घेऊ या!

कृती, चित्रे, संवाद, गोष्टी, गाणी आणि खेळ यांमुळे शिकणे अधिक सोपे आणि आनंददायी होईल. तुम्हांला स्वतःला प्रत्येक कृती करून शिकण्याची संधी या पाठ्यपुस्तकात मिळेल. शिक्षक तुमच्या कामाकडे लक्ष देतील आणि तुम्ही काय शिकला आहात हे पाहतील व त्याची नोंद घेतील. प्रत्येकाने आपल्या पद्धतीने शिकावे, प्रयत्न करावा आणि प्रत्येक कृतीत सहभाग घ्यावा, ही अपेक्षा आहे.

पुस्तकातील आवडलेल्या आणि आणखी भर घालण्यासारख्या अपेक्षित बाबी आम्हांला अभिप्राय रूपाने कळवायला विसरू नका. तुम्ही सादर केलेल्या कलाकृतींचे दृकश्राव्य साहित्यही मंडळाकडे पाठवा. चला तर मग, शिकू या, करू या आणि आनंद घेऊ या!

तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**(अनुराधा ओक)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : १९ एप्रिल २०२६
भारतीय सौर: वैशाख शु.२, शके १९४८

# शिक्षकांसाठी

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार कलाशिक्षण हा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खूप महत्वाचा मानला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जशीलतेला वाव देणे, कल्पनाशक्तीची क्षमता वाढवणे, अभिव्यक्तीसाठी प्रोत्साहन देणे आणि शिकण्याची प्रक्रिया आनंददायी करणे, हा कलाशिक्षण पाठ्यक्रमाचा हेतू आहे.

या पाठ्यपुस्तकात दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य व हालचाल या चार कला प्रकारांचा समावेश आहे. प्रत्येक कलाप्रकारातून विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्यासाठी, सादरीकरण करण्यासाठी, नवनिर्मिती करण्यासाठी आणि स्वतःच्या कल्पना व्यक्त करण्यासाठी वाव मिळणार आहे.

कृतियुक्त उपक्रम, गटकार्य, चर्चा भूमिकाभिनय या कलाध्यापन पद्धतीचा वापर करून अध्ययनाचा अनुभव दिला पाहिजे. प्रत्येक उपक्रमातून आनंददायी शिक्षण प्रक्रियेवर भर दिला पाहिजे. दृश्यकला, रंगमंच, संगीत, नृत्य आणि हालचालींच्या माध्यमांतून विद्यार्थी आपले विचार, भावना आणि कल्पना सहज व्यक्त करू शकतील. या पाठ्यपुस्तकात अधिक माहिती दिलेली आहे तथापि त्या माहितीवर प्रश्न अथवा स्वध्याय असे न घेता प्रात्यक्षिकांवर अधिक भर देणे अपेक्षित आहे.

या पुस्तकात चार विभागात दृश्यकला, रंगमंच, संगीत आणि नृत्य व हालचाल अशी विभागणी केली असली तरी वार्षिक नियोजनात या चारही विभागांतील घटक सारख्याप्रमाणात घेण्यात यावेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना वर्षभर चारही कला प्रकारांचा आस्वाद व अनुभव मिळत राहील. क्यु. आर्. कोडचा योग्य वापर करावा. प्रत्येक विभागानुसार खाली काही सूचना दिल्या आहेत.

### दृश्यकला

- विविध प्रकारच्या रेषा व आकार तसेच सुंदर अक्षर लेखनासाठी विविध अक्षर अवयवांचा सराव करून घ्यावा.
- नैसर्गिक घटक व मानवनिर्मित घटक यातील फरक समजून सांगावा व त्याची उदाहरणे द्यावीत.
- स्मरणचित्र काढण्याचे टप्पे समजून सांगावे. मात्र चित्र काढताना इतरांच्या चित्रांची कॉपी करणार नाही त्याची काळजी घ्यावी. तसेच प्रसंगाचे वर्णन करून स्मरणचित्र काढण्यासाठी प्रेरित करावे.
- स्मरणचित्र व कल्पना चित्र यांचे नमूने दाखवून दोघातील फरक स्पष्ट करावा. त्यांच्या कल्पनेला वाव मिळेल अशा कथा/गोष्टी सांगून वातावरण निर्मिती करावी.
- विविध प्रकारची चित्र नमुने, छायाचित्रे, शिल्पकलेचे नमुने यांचा संग्रह करावा व या संग्रहाचा शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करावा.
- सर्वच विद्यार्थी दृश्यकलेतील चित्र आवडीने काढतील असे नाही तर त्याबद्दलची आवड निर्माण करण्यासाठी प्रेरक असे अध्ययन अनुभव प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून देणे आवश्यक ठरते. या दृष्टीने एखादा विद्यार्थी नव्याने काही दृश्यकला सादर करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याला प्रोत्साहित करावे, योग्य असे मार्गदर्शन करावे.
- स्थानिक कला प्रकार व कलाकार यांचा परिचय करून द्यावा. शक्य असेल तर स्थानिक कलाकारांच्या कार्यशाळेस क्षेत्रभेट आयोजित करावी.

### रंगमंच

- वर्गात आनंददायी वातावरण निर्मिती करून सहज व नैसर्गिक कृती, हालचाली व मूक अभिनय करून घ्यावा. छोटे छोटे गट करून प्रसंग सादर करण्यास सांगावे.
- प्राणी, पक्षी, निसर्गातील विविध घटकांची भूमिका देऊन अभिनय करून घ्यावा.
- स्वतःचे संवाद व हालचाली सादर करण्याची संधी द्यावी. चित्र दाखवून प्रश्न विचारावेत. जसे की, ‘ तुम्हांला या चित्रातून काय दिसते ?’
- प्रत्येकाला भूमिका देऊन सादरीकरणात सहभागी करून घ्यावे. दैनंदिन अनुभवांशी निगडित प्रसंग निवडावेत.

- सादरीकरणात हालचाली करताना सुरक्षितता लक्षात घ्यावी. उपलब्ध साहित्याचा वापर विविध प्रकारे करण्याची सवय लावावी.
- एका गटाच्या सादरीकरणाचे इतर गटांतील विद्यार्थ्यांना निरीक्षण करण्याची संधी द्यावी. निरीक्षणात्मक अभिप्राय देण्यास प्रेरित करावे. वर्गनाट्यगृहाची संकल्पना राबवावी.

## संगीत

- वर्गात आनंददायी व उत्साही वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घ्यावा.
- गाणी शिकवताना स्वतः गाणे ऐकून सादरीकरण करावे. गाणी शिकवताना गाण्याचे छोटे छोटे भाग करून शिकवावे.
- ताल, लय आणि सूर यांची ओळख सोप्या उदाहरणांद्वारे करून द्यावी. तालासाठी टाळ्यांचा वापर करून गाणे अधिक रंजक बनवावे. एकल व युगल गायनासाठी प्रोत्साहन द्यावे.
- लोकसंगीत जसे वासुदेव गीत, पोवाडा, भारूड, भजन, जात्यावरची गाणी यांची ओळख करून द्यावी व प्रात्यक्षिकासह सराव करून घ्यावा.
- उपलब्ध वाद्यांचा (ढोल, टाळ, झांज, हार्मोनियम, तबला इत्यादी) वापर करून तालाची जाणीव करून द्यावी. छोट्या-छोट्या गटांमध्ये विभागून गाणी सादर करून घ्यावीत.
- प्रत्येक विद्यार्थ्याला गाण्यात अथवा वादनात सहभागाची संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.
- उपलब्ध साहित्य किंवा व्हिडीओच्या माध्यमातून स्वर व अलंकारांचा तालासुरात सराव करून घ्यावा.
- **प्रथम पृष्ठावरील क्यू.आर.कोडचा वापर करून गाणी ऐकवावी व शिकवावीत. गट व वैयक्तिक सादरीकरणाद्वारे मूल्यमापन करावे.**

## नृत्य व हालचाल

- वर्गात आनंदी व उत्साही वातावरण निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याला नृत्यात सहभागी होण्यास प्रेरित करावे.
- सहज, नैसर्गिक हालचालींमधून नृत्याची ओळख करून द्यावी.
- दैनंदिन हालचाली (उदा. चालणे, उडी मारणे, फिरणे) यांना नृत्यात रूपांतरित करण्यास सांगावे.
- ताल, लय व गती यांची जाणीव खेळकर पद्धतीने करून द्यावी.
- विविध भाव (आनंद, दु:ख, आश्चर्य) चेहऱ्यावरील हावभाव व्यक्त करण्यास मार्गदर्शन करावे.
- छोट्या-छोट्या गटांमध्ये साधे नृत्य प्रयोग सादर करण्यास प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक विद्यार्थ्याला नृत्यात स्वतःच्या शैलीत अभिव्यक्त होण्याची संधी द्यावी.
- नृत्य करताना शारीरिक सुरक्षितता, योग्य अंतर राखणे व योग्य पोशाख परिधान करण्याबाबत सूचना द्याव्यात.
- उपलब्ध साधनसामग्री (संगीत, जागा) यांचा योग्य वापर करून विविध प्रकारचे नृत्य अनुभव देण्याचा प्रयत्न करावा.
- नृत्याच्या शेवटी त्यांनी काय अनुभवले/शिकले यावर थोडक्यात चर्चा घ्यावी.सर्जनशीलतेला व आत्मविश्वासाला प्रोत्साहन देणारा सकारात्मक अभिप्राय द्यावा.

सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांचा सर्वसमावेशक विचार करून पाठ्यपुस्तक तयार केले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या क्षमतेनुसार सहभाग घेता यावा, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पाठ्यपुस्तकात उपक्रमांची रचना संवेदनशील दृष्टी ठेवावी.

प्रत्येक कला गटासाठी दिलेल्या अभ्यासक्रम ध्येय व क्षमता तसेच अध्ययन निष्पत्तीचा आधार घेऊन अधिक प्रभावी अध्यापन करतील अशी अपेक्षा आहे. यातून कलाविषयाकडे समग्र दृष्टीने पाहणारा कौशल्यपूर्ण विद्यार्थी तयार व्हावा व त्याला आनंददायी जीवन जगता यावे हाच उद्देश आहे. त्यासाठी आपण सर्व जण मिळून प्रयत्न करूया.

**कलाशिक्षण विषय समिती**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

| इयत्ता ३ री कलाशिक्षण | |
|---|---|
| **दृश्यकला** | |
| अभ्याक्रम ध्येय : CG –1 : कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे अन्वेषण, चित्र आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास विकसित करणे. | |
| क्षमता : C–1.1 : दैनंदिन जीवनातील भाव, भावना आणि कल्पना चित्रण करणाऱ्या विविध प्रतिमा उत्साहाने तयार करतो. | |
| **क्रमांक** | **अध्ययन निष्पत्ती** |
| 03AE01 | परिसरातील विविध  घटकांचे सोप्या पद्धतीने रेखाटन करतो. |
| 03AE02 | परिसरातील निरनिराळ्या घटकांचे स्मरणाने चित्रण करतो. |
| 03AE03 | चित्रामध्ये स्वतःच्या कल्पना मुक्तपणे मांडतो |
| 03AE04 | परिसरातील विविध घटक स्वकल्पनेने रेखाटतो. |
| **क्षमता : C – 1.2 :** दृश्यकलांमध्ये परस्पर समन्वय साधून काम करताना विविध कल्पना आणि प्रतिसादांची चर्चा करतो. | |
| 03AE05 | अक्षर अवयवांची ओळख करून अक्षर लेखन करतो. |
| 03AE06 | विविध अक्षर नमुन्यांपैकी सुंदर हस्ताक्षर नमुना शोधून त्यांचा अक्षर लेखनात वापर करतो. |
| अभ्याक्रम ध्येय : CG –2 : कलेच्या सरावासाठी आपली कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| क्षमता : C–2.1 : दैनंदिन निरीक्षणे, वैयक्तिक अनुभव आणि भावनांचे चित्रण करताना दृश्य घटकांच्या (रेषा, आकार, रंग, अवकाश, पोत) विविध संयोजनांचा सर्जनशीलपणे वापर करतो. | |
| 03AE07 | रेषा ही संकल्पना समजून घेऊन मुक्त रेषा रेखाटतो. |
| 03AE08 | विविध परिचित घटक आकारांचे स्मरणाने चित्रण करतो. |
| 03AE09 | परिसरातील नैसर्गिक घटकांचे स्मरणाने चित्रण करतो. |
| 03AE10 | दैनंदिन वापरातील वस्तूंचे सोप्या पद्धतीने चित्रण करतो. |
| क्षमता : C–2.2 : वर्गात सामायिक केलेल्या कलाकृतीचे दृश्य, घटक, संकल्पना आणि अभिव्यक्ती यांची तुलना आणि विरोधाभास स्पष्ट करतो. | |
| 03AE011 | आकारांचे तुलनात्मक रेखाटन करून चित्रण करतो. |
| 03AE12 | आकार व रंगांच्या संयोजनातून नक्षीकाम करतो. |
| 03AE13 | गडद व उजळ रंगछटांतील फरक ओळखून त्या रंगांचा नक्षीकामात वापर करतो. |
| अभ्याक्रम ध्येय : CG –3 : कलेतील मूलभूत प्रक्रिया, साहित्य व तंत्राचे अविष्कार करणे. | |
| क्षमता : C–3.1 : दृश्यकलांमध्ये काम करताना वापरली जाणारी साहित्ये, साधने व तंत्राची निवड करतो. | |
| 03AE14 | विविध साधनांचा वापर करून पोत निर्मिती करतो. |
| 03AE15 | उपलब्ध विविध साहित्य साधने व माध्यमांच्या रेखाटनासाठी उपयोग करतो. |
| 03AE16 | मुद्रा घेण्यासाठी विविध वस्तूंचा वापर करतो. |
| 03AE17 | परिसरातील उपलब्ध माध्यमे व साधनांचे संकलन करून त्यांपासून त्रिमित रचना करतो. |
| क्षमता : C–3.2 : वैयक्तिक आणि सामूहिक दृश्य कलाकृती तयार करताना नियोजन, अंमलबजावणी आणि  सादरीकरणाच्या टप्प्याचे पालन करतो. | |
| 03AE18 | कागदांचे लहान तुकडे करून वैयक्तिक/गटनिहाय कोलाज निर्मिती करतो. |
| 03AE19 | उपलब्ध साहित्य साधने व माध्यमांच्या एकत्रिकरणातून सोपे त्रिमितीय आकार साकारतो. |
| 03AE20 | संकलन केलेल्या पर्यावरण पूरक साहित्यांतून सोपे आकार वैयक्तिक/ गटात तयार करतो. |
| अभ्याक्रम ध्येय : CG –4 : सभोवतालच्या नैसर्गिक सौंदर्याचा शोध घेणे व विविध स्थानिक कलाप्रकार आणि सांस्कृतिक चालीरीतींची आवड निर्माण करणे. | |
| क्षमता : C–4.1 : **निसर्गातील दृश्य घटक ओळखतो आणि त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो.** | |
| 03AE21 | विविध रेषा व आकार रेखाटनातील फरक समजून रेखांकन करतो. |
| 03AE22 | विविध रेषा व आकार ओळखून त्यांच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करून रेखांकन करतो. |
| 03AE23 | निसर्गातील विविध घटकांचे सोप्या पद्धतीने रेखाटन करणे. |
| क्षमता : **C – 4.2 :** स्थानिक कलाकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दर्शवतो. | |
| 03AE24 | स्थानिक संस्कृतीबद्दल माहिती सांगतो. |
| 03AE25 | स्थानिक कलाकार/कलाप्रकारांची माहिती संकलित करून प्रकल्प करतो. |

## नाट्य

| | |
|---|---|
| अभ्याक्रम ध्येय : CG – 1 : कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे अन्वेषण, सादरीकरण आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास अनुभवातून विकसित करणे | |
| क्षमता : C – 1.1 : नाट्यकलेतील प्रसंग आणि अनुभव तसेच विविध घटकांचे, पात्रांचे उत्साहाने सादरीकरण करतो. | |
| 03AE26 | कुटुंब व परिसरातील दैनंदिन मानवी कृतींचे निरीक्षण करून सादरीकरण करतो. |
| 03AE27 | परिसरातील प्राणी व पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांच्या हालचालींचे उत्फूर्तपणे सादरीकरण करतो. |
| क्षमता : C – 1.2 : नाट्य कलाकारांमध्ये परस्पर समन्वय साधून काम करताना स्वतःच्या विचारांची प्रतिसादांची चर्चा करतो. | |
| 03AE28 | दैनंदिन वापरातील वस्तूंचे आवाज ओळखून सादरीकरण करणे. |
| अभ्याक्रम ध्येय : CG – 2 : कलेच्या सरावासाठी आपल्या कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| 03AE29 | सादरीकरणासाठी आवश्यक साहित्याची गटामध्ये चर्चा करून यादी तयार करतो. |
| 03AE30 | सादरीकरणासाठी वर्गातील सहकाऱ्यांना दृश्यघटक निर्मितीसाठी मदत करतो. |
| 03AE31 | परिसरात ध्वनी निर्माण होणाऱ्या वस्तूंचा शोध घेऊन त्याचा सादरीकरणासाठी कल्पकतेने वारप करतो. |
| क्षमता : C – 2.2 : नाटकाचा एखादा विषय घटक आणि वर्गात तयार केलेल्या त्यासंबंधित कलात्मक अभिव्यक्तींची तुलना व विरोधाभास दाखवतो. | |
| 03AE32 | निवडलेल्या प्रसंगाचे गटात सादरीकरण करतो. |
| 03AE33 | सादरीकरणानंतर चर्चेतून आलेल्या सूचनांचा विचार करून पुन्हा सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेतील मूलभूत प्रक्रिया, साहित्य आणि तंत्राचा आविष्कार करणे. | |
| **क्षमता : C – 3.1 : नाट्यकलेमध्ये काम करताना वापरल्या जाणाऱ्या साहित्य, साधने व तंत्राची निवड करतो.** | |
| 03AE34 | नाट्यकलांच्या सादरीकरणासाठी प्रत्यक्ष साहित्य उपलब्ध नसल्यास पर्यायी साहित्याचा वापर करतो. |
| 03AE35 | सादरीकरणासाठी आवश्यक वेशभूषा, सूचक रंगभूषा निवडून सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 3.2 : वैयक्तिक आणि सामूहिक नाटक करताना नियोजन अंमलबजावणी आणि सादरीकरणाच्या टप्प्याचे पालन करतो.** | |
| 03AE36 | नाटकातील विविध प्रसंग अथवा सादरीकरणाचा सराव करतो. |
| 03AE37 | सादरीकरण करताना सहाय्यभूत तांत्रिक बाबींचा योग्य वापर करतो. |
| 03AE38 | वर्ग नाट्यगृह या संकल्पनेतील मानवी शरीरकृतीतून पडदा तयार करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** सभोवतालच्या सौंदर्याचा शोध घेणे व विविध स्थानिक कलाप्रकार व सांस्कृतिक चालीरीतींची आवड निर्माण करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :निसर्गातील नाट्य आणि हालचालींचे घटक ओळखतो आणि त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो.** | |
| 03AE39 | नैसर्गिक प्रकाशाचा सादरीकरणात वापर कतो. |
| 03AE40 | सादरीकरणात ऋतूंचा विचार करून वेशभूषा करतो. |
| **क्षमता : C – 4.2 : स्थानिक कलाप्रकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दर्शवतो.** | |
| 03AE41 | परिसरात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे निरीक्षण करून गटांमध्ये चर्चा करतो. |
| 03AE42 | परिसरातील लोक कलाकारांच्या विषयी व त्यांच्या कलेविषयी माहिती जाणून घेऊन चर्चा करतो. |

## संगीत

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 : विविध कलाप्रकारातून स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी आणि मुक्तपणे अभिव्यक्त होण्यासाठी आत्मविश्वास विकसित करतो.** | |
| **क्षमता : C – 1.1 : विविध संगीत कृतींद्वारे त्याचे वैयक्तिक आणि दैनंदिन जीवनातील अनुभव आत्मविश्वासाने व्यक्त करतो.** | |
| 03AE43 | परिचित असलेले संगीत श्रवण करून गुणगुणतो. |
| 03AE44 | गायन, वादनाचा आवडीने सराव करून गातो. |
| **क्षमता : C – 1.2 : संगीत कलेमध्ये सामूहिक काम करताना स्वतःच्या विचारांची व प्रतिसादांची चर्चा करतो.** | |
| 03AE45 | सांघिक कृती करताना त्या कृतीवद्दल चर्चा करून आपले मत व्यक्त करतो. |
| 03AE46 | शिक्षकांनी तसेच सहकारी विद्यार्थ्यांनी गीत गायनामध्ये सुचवलेला बदल लक्षात घेऊन त्याप्रमाणे प्रतिसाद देतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 : कलेच्या सरावासाठी आपल्या कल्पनाशक्तीचा आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे.** | |
| **क्षमता : C – 2.1 : विविध प्रकारच्या गायन, वादन (एकल, युगल समूह) संगीत संयोजनातील गाणी आणि ताल यांचा सराव आणि सादरीकरण यांचे संयोजन करतो.** | |
| 03AE47 | परिचित गीतप्रकार उदा. बालगीत, अभिनय गीत ऐकून गातो. |
| 03AE48 | गायनाचे विविध प्रकार (उदा. एकल, युगल गायन) समजून घेऊन गातो. |
| 03AE49 | एकल व युगल गायनाचा सराव करून सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 2.2 : गीत आणि अभिव्यक्ती यांद्वारे वर्गात सादर केलेल्या संगीत कलेच्या विविध घटकांची तुलना आणि विरोधाभास (लय, ताल, सूर, भाव) दाखवतो.** | |

| | |
|---|---|
| 03AE50 | गीतांचे विविध प्रकार सांगतो व गातो. |
| 03AE51 | विविध गीतप्रकार ऐकून फरक ओळखतो. |
| 03AE52 | शास्त्रीय संगीतातील परिभाषा सांगतो. (उदा. संगीत आरोह, अवरोह) |
| 03AE53 | सोप्या अलंकारांची रचना व क्रम सांगतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 : कलेतील मूलभूत प्रक्रिया साहित्य व तंत्राचे आविष्कार करणे.** | |
| **क्षमता : C – 3.1 : संगीत कलेचे सादरीकरण करताना ध्वनी, वाद्ये आणि संयोजनासह, सादरीकरण करताना त्यांची निवड करतो.** | |
| 03AE54 | परिसरातील विविध आवाज ऐकून ओळखतो. |
| 03AE55 | परिसरातील विविध ध्वनी तसेच त्यातून निर्माण होणारी लय व ताल यांचा उपयोग करून गायन, वादन करतो. |
| **क्षमता : C – 3.2 : सादरीकरण आणि सरावात सहभागी होण्यासाठी संगीत निवडताना विविध कल्पना सुचवतो.** | |
| 03AE56 | ध्वनी व वाद्यांच्या सहाय्याने गीतप्रकार गाताना वेगवेगळ्या कल्पना सुचवून सादरीकरण करतो. |
| 03AE57 | विविध गीतांचा सराव करून गातो. |
| 03AE58 | सरावाच्या आधारे तयार केलेल्या गीतांचे सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** सभोवतालच्या सौंदर्याचा शोध घेणे व विविध स्थानिक कलाप्रकार व सांस्कृतिक चालीरीतींची आवड निर्माण करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 :निसर्गातील संगीत घटक ओळखतो व त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो.** | |
| 03AE59 | परिसरातील ऐकलेल्या ध्वनींचा संगीतातील ध्वनींशी संदर्भ जोडतो. |
| 03AE60 | स्थानिक परिसरातील कलाकारांची माहिती सांगतो. |
| **क्षमता : C – 4.2 : स्थानिक कलाप्रकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दाखवतो.** | |
| 03AE61 | परिसरातील/स्थानिक लोकसंगीत प्रकारांची माहिती घेऊन सहभागी होतो. |
| **नृत्य** | |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 1 :** कलेच्या माध्यमातून मानवी भावनांचे अन्वेषण, सादरीकरण आणि अभिव्यक्ती करण्याचा आत्मविश्वास अनुभवातून विकसित करणे. | |
| **क्षमता : C – 1.1 : परिचित असलेल्या नृत्य हालचालींचा सराव व प्रदर्शन उत्साहाने सादर करतो.** | |
| 03AE62 | परिचित नृत्यातील शारीरिक हालचालींचे क्रमशः लयबद्ध सादरीकरण करतो. |
| **क्षमता : C – 1.2 : नृत्य आणि हालचालींमध्ये सामूहिक सादरीकरण करताना कल्पना आणि प्रतिसादांची चर्चा करतो.** | |
| 03AE63 | नृत्य आणि हालचालींच्या सामूहिक सादरीकरणात सहयोग साधतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 2 :** कलेच्या सरावासाठी आपल्या कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा मुक्त वापर करणे. | |
| **क्षमता : C – 2.1 : दैनंदिन कृती आणि वैयक्तिक अनुभवांवर आधारीत नृत्य आणि हालचालींचा क्रम तयार करून सादर करतो.** | |
| 03AE64 | दैनंदिन जीवनात केल्या जाणाऱ्या शारीरिक हालचालींचा क्रम तयार करून सादर करतो. |
| **क्षमता : C – 2.2 : वर्गात सादर केलेला एखादा विषय, विविध नृत्य आणि हालचाली, विविध शैलीतील अभिव्यक्ती, ताल, मुद्रा यांची तुलना आणि विरोधाभास दर्शवतो.** | |
| 03AE65 | नृत्यातील लय, ताल या संकल्पना स्पष्ट करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 3 :** कलेतील मूलभूत प्रक्रिया आणि साहित्य तंत्राचा आविष्कार करणे. | |
| **क्षमता : C – 3.1 : नृत्यात वापरलेली वाद्ये, पोशाख, कृतिक्रम नृत्यातील आणि इतर व्यवस्था यांची निवड करतो.** | |
| 03AE66 | नृत्यासाठी वापरली जाणारी वाद्ये ओळखून त्यांची नावे सांगतो. |
| 03AE67 | विविध वेशभूषांचे निरीक्षण करून त्याद्वारे नृत्यप्रकार ओळखतो. |
| 03AE68 | विविध वेशभूषांप्रमाणे निरीक्षण करून काही नृत्य हालचाली करून दाखवतो. |
| **क्षमता : C – 3.2 : नृत्य आणि हालचालींचे क्रम निवडताना सादरीकरण आणि सरावात सहभागी होताना कल्पनांचे योगदान देतो.** | |
| 03AE69 | स्वतःच्या कल्पनेप्रमाणे विशिष्ट पद्यावर चर्चा करून त्यावर आधारीत नृत्य आणि हालचालींद्वारे सादरीकरण करतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय : CG – 4 :** सभोवतालच्या सौंदर्याचा शोध घेणे आणि विविध स्थानिक कलाप्रकार व सांस्कृतिक चालीरीतींची आवड निर्माण करणे. | |
| **क्षमता : C – 4.1 : निसर्गातील नृत्य आणि हालचालींचे घटक ओळखतो व त्यांच्या कलात्मक गुणांचे वर्णन करतो.** | |
| 03AE70 | निसर्गातील घटकांचे वर्णन करून विविध गीतांवर नृत्य आणि हालचाली करतो. |
| **क्षमता : C – 4.2 : स्थानिक कलाप्रकार आणि संस्कृतीबद्दल उत्सुकता दर्शवतो.** | |
| 03AE71 | विविध स्थानिक कलाप्रकारांचे वर्णन करून त्यातील नृत्य प्रकारांची माहिती सांगतो. |

**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# अनुक्रमणिका

## दृश्यकला


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १. नक्षीची गंमत | १ |
| २.अक्षरांच्या दुनियेत | ९ |
| ३. माझे चित्र व माझी कल्पना | १२ |
| ४. वस्तूंच्या दुनियेत | १६ |
| ५. त्रिमितीय कलाकृती | १९ |


## रंगमंच


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| ६. चला अभिनय करू या | २२ |
| ७. करू तयारी नाट्याची | २८ |
| ८. चला रंगमंचावर | ३२ |


## संगीत


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| ९. सारे मिळून गाऊ या | ३९ |
| १०. गीत एकाचे, गीत दोघांचे | ४७ |
| ११. सूर परंपरेचे | ५३ |
| १२. मैत्री सुरांशी | ६० |


## नृत्य


| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १३. नृत्याचा आनंद | ६६ |
| १४. नृत्यमय जीवन | ७१ |
| १५. नृत्याचे सोबती | ७६ |
| १६. कला संस्कृती | ८२ |

# दृश्यकला



# १. नक्षीची गंमत

आज आपण सभोवतालच्या एका सुंदर जगाची सफर करणार आहोत! तुम्ही कधी साडीच्या काठाचे निरीक्षण केले आहे का किंवा शर्टावरील छोट्या-छोट्या चौकोनांचे निरीक्षण केले आहे का? आपण जेव्हा घराबाहेर पडतो, तेव्हा घराच्या दाराला लावलेले तोरण, दारासमोर काढलेली रांगोळी या सर्वांमध्ये एक सारखेपणा दिसून येतो.





जेव्हा एखादी रेषा, एखादा आकार किंवा एखादा रंग एकापाठोपाठ एक ठरावीक क्रमाने पुन्हा पुन्हा येतो, तेव्हा तिथे एक सुंदर 'नक्षी' तयार होते. नक्षी म्हणजे केवळ चित्र नव्हे, तर ती आहे 'रेषांचा, आकारांचा, रंगांचा एक आकृतिबंध, पुनरावृत्ती किंवा लय'.





आपल्या घरातल्या फरशीवर, खिडकीच्या लोखंडी जाळीत, अगदी आपण काढलेल्या रांगोळीतही नक्षी दडलेली असते. कधी ती सरळ रेषेत असते, तर कधी नागमोडी वळणाची असते. कधी ती गोल असते, तर कधी त्रिकोणी! आज आपण साध्या रेषांच्या मदतीने हीच 'नक्षीची गंमत' अनुभवणार आहोत. चला तर मग, आपणही आपल्या कल्पकतेने कागदावर नक्षीचे जग फुलवू या!

### नक्षी : रेषा आणि आकार

सुंदर नक्षीकामासाठी आपल्याला रेषा आणि आकारांशी मैत्री करावी लागेल. कारण रेषा आणि आकार हा नक्षीकामाचा पाया असतो.

**रेषांची ओळख:** उभ्या, आडव्या, तिरप्या, तुटक रेषा, वक्र रेषा, नागमोडी रेषा इत्यादी


उभी रेषा


आडवी रेषा


तिरपी रेषा


तुटक रेषा


वक्र रेषा


नागमोडी रेषा

- दैनंदिन जीवनातील विविध नक्षीकामाचे नमुने दाखवून इतर उदाहरणे विचारावीत. नक्षीकामात वापरल्या जाणाऱ्या विविध आकारांविषयी चर्चा करावी.

CG – 4
C –4.1
LO– 03AE21

आपल्या आवतीभोवती दिसणारे हे विविध आकार पाहिले तर त्यामध्ये काही भौमितिक आकार तर काही नैसर्गिक आकार दिसून येतात.

**भौमितिक आकार:** त्रिकोन, चौकोन, आयत, वर्तूळ, अर्धवर्तूळ.



त्रिकोण चौकोन आयत वर्तूळ अर्धवर्तूळ

**नैसर्गिक आकार:** पाने, फुले, पक्षी, प्राणी, चंद्र आणि तारे .



## रेषा व आकारांचा सराव करूया.

कागदावर विविध प्रकारच्या रेषा काढा. त्यानंतर मुक्तहस्ते गोलाकार आणि विविध भौमितिक व नैसर्गिक आकार काढण्याचा सराव करा.

## रेषांच्या माध्यमातून नक्षीकाम करू या

पुढील चौकटीत केवळ उभ्या आणि नागमोडी रेषांची पुनरावृत्ती करा. पहा, एक साधी पण आकर्षक नक्षी तयार होईल. त्यानंतर तुमच्या वहीत फक्त वेगवेगळ्या रेषा वापरून नक्षी तयार करा.

## आकारांच्या माध्यमातून नक्षीकाम करू या

पुढील चौकटीत फक्त भौमितिक आकार जसे चौकोन, वर्तूळ आणि त्रिकोण यांचा वापर करा. तुम्हांला आवडेल अशा क्रमाने मांडणी करून आकारांची नक्षी तयार करा.

- विविध आकारांची ओळख करून घ्यावी.
- सुरुवातीला केवळ रेषा व नंतर केवळ आकारांच्या माध्यमातून नक्षी तयार करून घ्यावी.
- रेषा आणि आकार यांच्या माध्यमातून नक्षी तयार करण्याची संधी द्यावी.

CG – 2
C –2.1
LO7/12/21

### रेषा आणि आकार यांच्या माध्यमातून सुंदर नक्षीकाम करू या!

पुढील चौकटीत आतापर्यंत आपण शिकलेल्या विविध रेषांपैकी तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही रेषा आणि नैसर्गिक आकारांच्या सहाय्याने सुंदर नक्षी तयार करा.

### गडद आणि उजळ रंगांची ओळख

तुम्हांला विविध रंग व त्यांची नावे माहीत आहेतच. आता आपण गडद आणि उजळ रंगांची ओळख करून घेऊ या.

आता या रंगांचे निरीक्षण करा आणि सांगा कोणकोणते रंग तुमच्या डोळ्यांना उजळ वाटतात आणि कोणते गडद वाटतात?



- **गडद रंग :** निळा, गडद हिरवा, जांभळा, काळा हे रंग गडद श्रेणीत येतात.
- **उजळ रंग:** पिवळा, नारिंगी, लाल हे रंग उजळ आणि तेजस्वी दिसतात.

**लक्षात ठेवा :** नक्षीमध्ये रंग भरल्यामुळे ती जिवंत वाटते. नक्षीमध्ये एक गडद आणि एक उजळ रंग आलटून-पालटून भरल्यास नक्षी उठून दिसते.

### रेखाटन व रंगकाम करू या.

आता पुढे चौकटी दिल्या आहेत. त्या चौकटीत तुम्हांला आवडेल अशा रेषा आणि आकार यांचा वापर करून सुंदर नक्षी काढा. आता पहिल्या चौकटीतील नक्षी उजळ रंगाने रंगवा. तर दुसऱ्या चौकटीतील नक्षी गडद रंगाने रंगवा.

### नक्षी रेखाटून उजळ रंगाने रंगवा.

- गडद व उजळ रंग छटा यांचा परिचय करून द्यावा.
- गडद व उजळ रंगात नक्षी रंगवण्यास सांगावे.

CG-2
C-2.2
LO- 03AE12/13

नक्षी रेखाटून गडद रंगाने रंगवा.

नक्षी रेखाटून गडद व उजळ अशा दोन्ही रंगात रंगवा.

## ठसेकामातून नक्षीकाम

आतापर्यंत आपण रेषा, आकार, रंग यांच्या माध्यमातून सुंदर नक्षी तयार करून रंगवली आहे.
आता हे खालील नक्षीकाम पाहा. तुम्हांला काय वेगळेपण दिसते त्यावर चर्चा करा.
आपल्याला सुद्‌धा ठसे घेऊन नक्षी तयार करता येते.





चला तर मग विविध प्रकारचे ठसे आणि ठसे घेण्याची पद्‌धती समजून घेऊ या.
ठसेकाम हे नक्षीकामाचे सोपे तंत्र आहे.

आपण आपल्या आजूबाजूला असलेल्या कोणत्याही वस्तूंचे ठसे घेऊ शकतो. मात्र तो ठसा कागदावर उमटवता आला पाहिजे. उदा. भेंडी, कांदा, पेनाचे टोपण, पाने, हाताची बोटे, चुरगळलेला कागद इत्यादी.

ज्या वस्तूचा ठसा घ्यायचा आहे त्या वस्तूचा पृष्ठभाग रंगाच्या डिशमध्ये बुडवून तो कागदावर अलगद दाबावा जेणेकरून त्याचा आकार कागदावर उमटेल. पुढे काही ठसे घेतले आहेत. ते ठसे पाहून तुम्हांला ते ठसे कशाचे आहेत हे ओळखता येईल का ते पाहा व लिहा.

- ठसे कामातून तयार केलेल्या नक्षीकामाचे नमुने दाखवावेत व ते ठसे कोणत्या वस्तूंचे आहेत ते ओळखण्यास सांगावे.
- ठसेकामातून नक्षीकाम करून घ्यावे.

CG – 2
C –2.2
LO–03AE13,/16

## ठसे ओळखा व लिहा.





........................



........................



..................

..................

## ठसेकामातून नक्षी निर्मिती करू या

आपल्या चित्रकला वहीत भेंडी कापून तिचे रंगात बुडवलेले ठसे एका रेषेत उमटवा. दोन ठशांमध्ये बोटाचा ठसा उमटवून नवीन नक्षी तयार करा.

खूपच छान !

आता वहीत अशा चौकटी तयार करा आणि विविध वस्तूचे ठसे घेऊन सुंदर नक्षी तयार करण्याचा सराव करा. त्यातील आवडलेली नक्षी आपल्या शिक्षकांना दाखवा.

## पोत निर्मिती व नक्षीकाम

वस्तूचा पृष्ठभाग हाताला कसा लागतो (खडबडीत की गुळगुळीत) याला 'पोत' म्हणतात. अशा खडबडीत पृष्ठभागाच्या आधारे कागदावर पोत तयार करता येतो.पोत तयार करण्यासाठी पुढील पायऱ्यांनुसार कृती करा.

- कोणताही खडबडीत पृष्ठभाग निवडा जसे की, नाणे, गोणपाट, कंगवा, ज्यूटची पिशवी, खडबडीत पृष्ठभाग असलेल्या काचा, झाडाच्या पानांच्या शिरेकडील पृष्ठभाग, झाडाचे खोड इत्यादी.
- ज्याचा पोत कागदावर घ्यायचा आहे ती वस्तू कागदाखाली ठेवा. वरून पेन्सिलने हलक्या हाताने घासा, पहा कागदावर एक छान पोत तयार होईल.

- विविध वस्तूंचे ठसे घेऊन नक्षकाम करण्याची संधी द्यावी व सराव करून घ्यावा.

CG - 3
C -3.1
LO- 03AE13, 16



- तयार झालेल्या पोतांचे विविध आकारात काप घ्या. उदा. त्रिकोणी, चौकोनी, गोल, अर्धवर्तूळ, वर्तूळ इत्यादी.
- पोताच्या सहाय्याने तयार केलेले हे विविध प्रकारचे व विविध रंगांचे आकार कागदावर चिकटवून नक्षीदार रांगोळी तयार करा.
- पोतनिर्मिती करण्यासाठी रंगीत पेन्सिल, तेल खडू यांचा देखील वापर करता येतो.

## कोलाज तंत्राच्या साहाय्याने नक्षीकाम



आता नक्षीचा पुढील नमुना पहा. यामध्ये तुम्हांला काही वेगळेपणा जाणवत आहे का? ते आपल्या वर्गातील गटामध्ये चर्चा करा.

सोबतचे चित्र हे रंगाने रंगवलेले नाही किंवा ठसे घेऊन तयार केलेले नाही. तर कागदाचे छोटे तुकडे चिकटवून तयार केले आहे. यालाच 'कोलाज' चित्र म्हणतात.

कोलाज म्हणजे विविध प्रकारचे कागद, कापड किंवा इतर वस्तूंचे छोटे तुकडे एकत्र चिकटवून तयार केलेली कलाकृती असते. चित्रात कोलाज तंत्र वापरल्यास एक सुंदर कलाकृती तयार होते.

- परिसरातील विविध पृष्ठभागांवरील पोतनिर्मिती करण्याचे प्रात्यक्षिक दाखवून विविध पोत घेण्याची संधी द्यावी.
- विविध पोतांच्या माध्यमातून चित्र/ नक्षी तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

CG - 3
C -3.1, 3.2
LO- 03AE14, 18

### कागद कामातून नक्षी तयार करू या.

यासाठी जुनी वर्तमानपत्रे, रंगीत मासिकांचे तुकडे, कात्री, डिंक आणि पांढरा कागद घ्या.
आता पुढील क्रमाने कृती करा.

१. रंगीत कागदांचे छोटे छोटे त्रिकोण, वर्तूळ आणि चौरस आकार कापून घ्या.
२. पांढऱ्या कागदावर पेन्सिलने ५ से.मी. रुंदीची एक लांब पट्टी तयार करा.
३. या पट्टीमध्ये आधी कापलेले रंगीत आकार एका विशिष्ट क्रमाने (उदा. एक त्रिकोण, एक वर्तूळ) चिकटवा.
४. दोन आकारांच्या मध्ये रिकामी जागा सोडून तिथे रंगीत कागदाच्या बारीक पट्ट्या चिकटवा.
५. पहा, तुमची 'कागद कामाची कोलाज नक्षी' तयार झाली!

तयार झालेली नक्षी आपल्या शिक्षकांना दाखवा.
सरावासाठी आणखी वेगवेगळ्या रंगाच्या कागदाच्या तुकड्यांपासून नक्षी तयार करा.

### कागदापासून जाळीदार नक्षी

आतापर्यंत आपण कागदावर नक्षी काम केले, पण कागदापासून देखील नक्षीकाम करता येते बर का!

यासाठी आपल्याला पाहिजेत...

- रंगीत किंवा पांढरे चौकोनी कागद
- लहान कात्री (बोथट टोकाची, मुलांसाठी सुरक्षित).
- पेन्सिल.



### आता एक एक पायरीने ही नक्षी तयार करू या

**पायरी १:** कागदाची घडी घालणे

- सर्वात आधी एक गडद रंगांचा चौकोनी घोटीव कागद घ्या.
- त्या कागदाला मधून बरोबर दुमडून त्याचा आयत तयार करा.



**पायरी २:** नक्षीचे रेखाटन

- आता कागदाच्या बंद बाजूवर आणि उघड्या बाजूवर पेन्सिलने लहान मोठे आकार काढा.
- उदा. छोटा त्रिकोण, अर्धवर्तूळ किंवा वर्तूळ किंवा

- कोलाज तंत्राचे नमुने दाखवून कोलाज तंत्राची संकल्पना समजून सांगावी.
- विविध रंगीत कागद, मासिके, वर्तमान पत्रांतील रंगीत कागदांचा वापर करून नक्षीकाम करण्यास सांगावे.

CG – 2
C –2.2
LO– 03AE 12

कोणताही आवडता आकार.

- कागदाची मधली बंद बाजू पूर्णपणे कापली जाणार नाही याची काळजी घ्या, अन्यथा कागदाचे तुकडे होऊन नक्षी सुटी होईल.



**पायरी ३:** कात्रीने कापणे

- पेन्सिलने काढलेल्या खुणांवरून हळुवारपणे कात्रीने कागद कापून घ्या.
- कापलेले छोटे तुकडे बाजूला काढून टाका.



**पायरी ४:** नक्षी उलगडणे

- आता हळूच कागदाच्या सर्व घड्या उघडा.
- तुम्हांला कागदावर एक सुंदर, एकसारखी आणि चक्राकार नक्षी दिसेल!



**पायरी ५:** नक्षीचा कागद चिटकवणे.

- तयार झालेल्या नक्षीचा कागद वहीत चिकटवा.

आता आपण कागदाची चौकोनी घडी घालून नक्षी तयार केली. पण तुम्ही कागदाची वेगवेगळ्या प्रकारे घडी घालून देखील सुंदर नक्षी तयार करा आणि रंगीत कागदावर चिकटवा.

## माझी कृती

१) पाच वेगवेगळ्या प्रकारच्या रेषा वापरून तुमच्या वहीच्या पानाला एक सुंदर बॉर्डर तयार करा.

२) विविध ठशांच्या सहाय्याने एक सुंदर शुभेच्छा पत्र/भेटकार्ड तयार करा.

३) एक त्रिकोणी आकार काढून त्यात एक नक्षी काढा. त्यात फक्त उजळ रंगांचा वापर करून रंगकाम करा.

४) जुन्या वर्तमानपत्रातील फक्त जाहिरातींचे रंगीत भाग निवडा. त्याचे हातानेच लहान गोल तुकडे करा. हे तुकडे एका सरळ रेषेत चिकटवून रंगीबेरंगी 'मण्यांची माळ' तयार करा.

५) एका कागदावर पाच त्रिकोण आणि पाच वर्तुळ आकार कापा. या आकारांचा वापर करून अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या नक्षी तयार करता येतील, ते वहीत चिकटवा.

- मुलांनी तयार केलेल्या नक्षीकामाचे वर्गात प्रदर्शन भरवावे.

CG – 2,3,4
C –2.1, 2.2, 3.1, 3.2, 4.1
LO–03AE12/13/16/21/23/14/18

# २. अक्षरांच्या दुनियेत

पुढे दिलेले सुंदर हस्ताक्षरांचे नमुने पहा. किती छान, वळणदार आणि सुंदर अक्षरे, किती सुंदर दिसतात ना .. आपलेही अक्षर असे वळणदार आणि सुंदर करण्यासाठी अक्षर लेखनाचा सराव करू या.










## सराव करू या अक्षर लेखनाचा.



सुंदर हस्ताक्षरासाठी अक्षरांच्या अवयवांचा सराव करणे आवश्यक आहे. काही अक्षर अवयव काढून दाखवले आहेत. हे अक्षर अवयव कोणत्या क्रमाने व ती कशी काढावीत हे दाखवले आहे. त्याप्रमाणे अक्षर अवयवांचा सराव करा.

छान! आता या अक्षर अवयवांचा अधिकचा सराव आपल्या दुरेघी वहीमध्ये करा आणि आपल्या शिक्षकांना दाखवा.

- विविध अक्षरांचे अवयव व त्यांची वळणे काढण्याचे प्रात्यक्षिक दाखवावे.
- अक्षर अवयव काढताना योग्य दिशेने काढत असल्याची खात्री करावी.
- वहीमध्ये अक्षर अवयवांचा सराव करण्यास सांगावे.

CG-1
C-1.2
LO-03AE5

## अक्षर अवयवांकडून अक्षरांकडे

आपण अक्षर अवयव शिकलो आणि त्याचा सराव देखील केला आहे. आता या अवयवांपासून अक्षर कसे तयार होते हे शिकू या आणि सराव करू या.

अक्षर लेखनाचा अधिक सराव दुरेघी वहीत करा आणि आपल्या शिक्षकांना दाखवा.

## नमुनादाखल काही अक्षरे



## अक्षराकडून शब्दांकडे

अक्षरे काढायची शिकलो आता अक्षरांपासून सुंदर हस्ताक्षरात शब्द लिहूया.




याप्रमाणे तुम्ही कोणतेही वीस शब्द सुंदर हस्ताक्षरात लिहा.

- अक्षर अवयवांपासून अक्षरे लिहिण्याची पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे दाखवावी.
- अक्षरांपासून लेखन करण्याचा सराव करून घ्यावा.
- विविध शब्द, वाक्ये वहीत सुंदर हस्ताक्षरात लिहीण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

CG – 1
C –1.2
LO– 03AE5

## सुंदर अक्षरातील शुभेच्छा पत्र!

पुढे काही नमुना निमंत्रणपत्रिका व शुभेच्छा पत्रे दिली आहेत त्यांचे निरीक्षण करा. तुम्हीही विविध निमंत्रण पत्रिकांचा संग्रह करा. या संग्रहातील अक्षरांची वळणे पहा. तुमच्या आवडीनुसार एक शुभेच्छा पत्र तयार करून सुंदर हस्ताक्षरात लिहून शिक्षकांना दाखवा.










## विविध माध्यमांतून अक्षर लेखन

अक्षर लेखन करण्यासाठी पेन्सिल, शाईपेन, बॉलपेन, स्केचपेन, तेलखडू, अशा विविध माध्यमांचा वापर करता येतो.

पेन्सिल – 


शाईपेन – 


बॉल पेन – 


स्केच पेन – 


तेल खडू – 


## माझी कृती

१. वृत्तपत्रातील तसेच पुस्तकातील सुविचारांचा संग्रह करा व ते सुविचार आपल्या वहीमध्ये सुंदर अक्षरात लिहा.

२. आपले स्वतःचे नाव विविध लेखन साहित्य साधनांच्या साहाय्याने वहीमध्ये लिहा.

उदा. पेन्सिल, शाईपेन, बॉल पेन, स्केच पेन, तेल खडू.

- निमंत्रण पत्रिका व शुभेच्छा पत्रे यांचे नमुने दाखवावे.
- निमंत्रण पत्रिका व शुभेच्छा पत्र यांचा संग्रह करण्यास सांगावे.
- विविध प्रकारच्या अक्षर वळणांचा शुभेच्छा पत्रांत वापर करण्यास सांगावे.
- विविध माध्यमांतून अक्षर लेखन करण्याचे प्रात्यक्षिक दाखवावे.

CG - 1
C -1.2
LO- 03AE5,6

# ३. माझे चित्र, माझी कल्पना

काल काय घडले ते आज आपण आठवून सांगू शकतो. तसेच आपण पाहिलेला प्रसंग, वस्तू आणि अनुभव याचे वर्णन करू शकतो. तसेच तो प्रसंग आठवून त्याचे चित्रही काढू शकतो. अशा आठवून काढलेल्या चित्रालाच 'स्मरणचित्र' म्हटले जाते. स्मरणचित्र म्हणजे स्मरणाने आठवून काढलेले चित्र.

स्मरणचित्र काढण्यासाठी तुम्हांला रेषा व आकार यांच्याशी मैत्री करावी लागेल, ज्याचा सराव तुम्ही नक्षीकाम करताना केला आहेच, चला तर अजून थोडा सराव करू आणि सुंदर स्मरणचित्र काढू या.

**हवेतील रेखांकन –** तुमच्या आवडत्या फुलाचा किंवा फळाचा आकार हवेत बोटाने काढून पहा. आता तोच आकार कागदावर पेन्सिलने काढा.

**मुक्त रेषा –** कागदावर न थांबता सलग वर्तुळाकार, नागमोडी आणि तिरक्या रेषा काढा. या रेषांतून तुम्हांला एखादा चेहरा किंवा डोंगरांसारखा आकार दिसतो का ते पहा.

**माणसांची चित्रे –** माणसांच्या हालचाली दाखवण्यासाठी (बसणे/चालणे/धावणे/नाचणे) साध्या रेषांच्या माध्यमातून काढलेली काडीचित्रे पाहून अशा काही माणसाच्या आकृत्या काढण्याचा सराव करा.



## निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित घटकांची सोपी रेखाटने

आपल्या आजूबाजूला विविध प्रकारच्या वस्तू , घटक पाहायला मिळतात. यातील काही घटक हे निसर्गनिर्मित असतात तर काही मानवनिर्मित असतात.

निसर्गनिर्मित घटक–उदाहरणार्थ– झाडे, पाने, फुले, पक्षी, प्राणी, डोंगर, नदी इत्यादी. मानवनिर्मित घटक–उदाहरणार्थ– घर, गाडी, पुस्तक, संगणक, बॅट, पेला इत्यादी

याशिवाय तुम्ही पाहिलेल्या पाच नैसर्गिक घटकांची व पाच मानवनिर्मित वस्तूंची यादी लिहा.

- मुलांच्या अनुभव विश्वातील वस्तू, फळे यांची नावे घेत त्यांना हवेत त्याचे आकार काढण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.
- काडीचित्रे काढण्यासाठी काही कृतींची नावे सांगा व सराव करण्याची संधी द्यावी.

CG – 1, 2
C –1.2, 2.1
LO– 03AE2,7,15

| निसर्गनिर्मित घटक | मानवनिर्मित घटक |
| --- | --- |
| ......................... | ......................... |
| ......................... | ......................... |
| ......................... | ......................... |
| ......................... | ......................... |
| ......................... | ......................... |

तुमच्या आवडीनुसार यादीतील तुम्ही पाहिलेल्या एका नैसर्गिक घटकाचे व एका मानवनिर्मित वस्तूंचे चित्र वहीत पेन्सिलने काढा.

चित्र काढण्यापूर्वी त्या घटक किंवा वस्तूचा सर्व तपशील आठवा. त्याचा आकार, रचना, रंग, स्पर्श हे आठवण्याचा प्रयत्न करा. त्यानंतरच या घटकाचा मूळ आकार व त्यातील तपशीलाचे बारकावे रेखाटा.

आता तुम्ही पाहिलेल्या नैसर्गिक घटक किंवा वस्तूंची काही काढलेली चित्रे आपल्या शिक्षकांना व वर्गमित्रांना दाखवा.

### प्रसंगाचे स्मरणचित्र

आता आपण तुमच्या आठवणीतील एक चित्र काढू या. तुम्हांला तुमचा शाळेचा पहिला दिवस आठवत असेलच.

तर आपण 'शाळेचा पहिला दिवस' या विषयावर स्मरणचित्र काढू या.

१. **आठवू या –** शाळेचा पहिला दिवस कसा होता? तुम्ही कसे शाळेत आलात? शाळेची इमारत वर्ग आठवतो का? शाळेत तुमचे स्वागत कसे झाले? तुम्हांला शाळेत सोडवायला कोणी आले होते का? शाळेचा परिसर कसा होता? शाळेत येताना तुम्हांला कसे वाटत होते? यातील कोणत्या बाबी तुम्हांला स्पष्टपणे आठवत आहे ते निश्चित करा. तो घटक कोणत्या भौमितिक आकारासारखा दिसतो, ते ठरवून त्याचे रेखाटन करा.

२. **मुख्य आकृतीची रचना –** चित्राच्या मध्यभागी स्वतःची किंवा मित्राची आकृती काढा. मुख्य आकृतीची रचना, चित्रातील महत्त्वाचे घटक व त्या घटकांच्या ढोबळ आकृत्या पेन्सिलने पुसट रेखाटा.

३. **तपशील –** चित्रातील सर्व घटकांची रचना निश्चित झाल्यावर आठवणीप्रमाणे बारीक तपशील रेखाटा जसे, शाळेची भिंत, शाळेच्या प्रवेशद्वारावर लावलेले तोरण, स्वागताचा फलक इत्यादी.

४. **रंगकाम–** स्मरण चित्र रेखाटून पूर्ण झाल्यानंतर रंगकाम करा. स्मरणचित्रात आपण जे पाहिले आहे, ते तसेच दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. आपल्या आवडत्या रंग माध्यमात चित्र रंगवून पूर्ण करा.

- निसर्गनिर्मित/ मानवनिर्मित घटकांचे वर्णन करताना त्यातील दृश्य तपशील सांगण्यास प्रोत्साहन द्यावे.
- वर्णनानुसार चित्रात तपशील दाखवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

CG – 1
C –1.1
LO03AE02

खाली दिलेली दोन्ही चित्रे पहा आणि त्यातील फरक समजून घ्या.

यातील एक आहे स्मरणचित्र आणि दुसरे आहे कल्पनाचित्र. **स्मरण चित्रात** आपण पाहिलेला प्रसंग वस्तू घटक हा जसा आहे तसा रेखाटण्याचा व रंगवण्याचा प्रयत्न केला जातो.

**कल्पनाचित्र** हे स्मरण चित्रापेक्षा वेगळे आहे. त्या चित्रात नावीन्यपूर्ण आणि वास्तवापेक्षा वेगळे घटक दिसतात. या चित्रात आपल्याला आपल्या मनातील अनोख्या अशा कल्पना दाखवता येतात. आपल्या मनातील गमतीदार कल्पना चित्राद्‌वारे काढल्या जातात त्या चित्राला कल्पनाचित्र असे म्हटले जाते .



..........................................................



..........................................................

वरील दोन्ही चित्रामधील कोणते चित्र स्मरणचित्र व कोणते कल्पनाचित्र असेल ते ओळखून त्या चित्राखाली त्याचे नाव लिहा.

**कल्पनेमधून एक अनोखे कल्पना चित्र काढूया**

ज्या गोष्टी प्रत्यक्षात नसतात पण आपण तसा विचार करू शकतो, अशा कल्पनेवर आधारीत चित्राला कल्पनाचित्र म्हणतात. पक्ष्यांना जसे पंख असतात तसे आपल्याला पंख नसतात. पण जर तुम्हांला पंख असते तर?

चला तर मग आपण ‘मला पंख असते तर...’ या विषयावर कल्पनाचित्र काढू या.

**खाली दिलेल्या टप्प्याटप्प्याने चित्र काढा.**

**१. कल्पना करा – मला पंख असते तर** मी दैनंदिन जीवनात काय काय केले असते? शाळेत कसा आलो असतो? पक्ष्याप्रमाणे झाडावर, डोंगरावर उडत गेलो असतो का? चंद्रावर गेलो असतो का? पंखाने उडून आणखी काय काय केले असते? तुमचे पंख कोणत्या रंगाचे असते याची कल्पना करा. कल्पना केलेल्या प्रसंगातून तुमची आवडती कल्पना निश्‍चित करा.

- मुलांना मानवी आकृती काढताना काडीचित्र काढून पूर्ण आकृतीकडे नेण्याचा सराव द्यावा.
- स्मरणचित्र आणि कल्पनाचित्र यातील फरक स्पष्ट करा.

CG – 1
C – 1.1
LO – 03AE03

**२. मुख्य आकृती –** चित्राच्या मध्यभागी तुमच्या कल्पनेतील आकृती पेन्सिलने पुसट रेखाटा.
तपशील – तुमच्या कल्पनेतील इतर पार्श्वभूमीतील तपशील बारकाईने चित्रात रेखाटा.
उदा. डोंगर, ढग, चंद्र, इंद्रधनुष्य अशी कल्पनेप्रमाणे पार्श्वभूमी रेखाटा.

**३. कल्पनेत काहीही शक्य असते!** झाडांना फुलांऐवजी चॉकलेटस् लागलेली दाखवा किंवा ढगांतून पाऊस नाहीतर रंगीत गोळ्या पडताना दाखवा. तुम्ही अशी काहीही कल्पना करू शकता.

**४. रंगकाम :** तुमच्या आवडीचे कोणतेही अनोखे रंग तुम्ही कल्पनाचित्र रंगवण्यासाठी वापरू शकता.

आपले कल्पनाचित्र वर्गातील मित्र व शिक्षकांना दाखवा आणि तुमच्या चित्रातील कल्पनेविषयी चर्चा करा.

**लक्षात ठेवा :**
कल्पनाचित्रात रंगांचे कोणतेही बंधन नसते. तुम्ही तुमचे स्वतःचे जग तयार करू शकता. उदा. जांभळे गवत, गुलाबी आकाश काढू शकता.

## माझी कृती

१) आवडत्या प्राण्याचे चित्र काढा.
२) कोणत्याही एका सणाचे चित्र काढा.
३) 'आकाशातून उडणारी माझी गाडी' या विषयावर कल्पनाचित्र काढा.
४) 'माझ्या स्वप्नातील परी' या विषयावर कल्पनाचित्र काढा.

- विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळेल असे प्रश्न विचारून कल्पनाचित्र काढण्यास व रंगवण्यास प्रोत्साहित करावे.

CG - 1
C - 1.1
LO- 03AE03,4

# ४. वस्तूंच्या दुनियेत

दैनंदिन जीवनात आपण अनेक वस्तूंचा वापर करतो. घरात, शाळेत, परिसरात अनेक लहान मोठ्या वस्तू आपल्याला दिसून येतात. वस्तूंचा वापर करताना त्या वस्तूंच्या वैशिष्ट्यांची आपल्याला जाणीव होत असते. जसे की, त्यांचा आकार, जाडी,लांबी, रुंदी, रंग व त्याचा पोत इत्यादी.

वस्तूंचे चित्र काढण्यासाठी प्रथम त्या वस्तूंचे निरीक्षण करून त्याची वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक ठरते. वस्तूंचे निरीक्षण करून त्यांचे वैशिष्ट्ये समजून घेऊया. वस्तूंचा आकार, त्या वस्तूमध्ये दडलेले भौमितिक आकार, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या रेषा, त्याचा रंग तसेच त्याचा पोत इत्यादी.

## आकार आणि वस्तू

आपल्या परिसरातील वस्तूंचे निरीक्षण करा आणि खालील भौमितिक आकारानुसार त्यांचे गट करून वस्तूंची नावे लिहा.

| चौकोनी आकाराच्या वस्तू | त्रिकोणी आकाराच्या वस्तू | गोलकाराच्या वस्तू | अनेक भौमितिक आकार असलेल्या वस्तू |
|---|---|---|---|
| ...................... | ...................... | ...................... | ...................... |
| ...................... | ...................... | ...................... | ...................... |
| ...................... | ...................... | ...................... | ...................... |
| ...................... | ...................... | ...................... | ...................... |

## वस्तूमध्ये दडलेले भौमितिक आकार शोधू या.

चित्रात दिलेल्या वस्तूंचे निरीक्षण करा. त्यात लपलेले भौमितिक आकार शोधून शेजारील चौकोनात काढा.





तुम्हाला वस्तूंचे निरीक्षण करून त्यातील भौमितिक आकार शोधता आले आहेत. आता तुम्हाला वस्तूचित्र सहजतेने काढता येईल.

- वस्तू व त्यातील भौमितिक आकार ओळखण्यासाठी प्रश्न विचारावेत.

CG - 1
C -1.1
LO- 03AE01

## चित्र काढू या वस्तूंचे

सोबत ठेवलेल्या दोन वस्तूंचे वस्तूचित्र पुढील टप्प्याने काढू या.

१. प्रथम वस्तूंचे निरीक्षण करा.

२. सुरुवातीला त्या वस्तूंमधील लपलेले भौमितिक आकार शोधा.

३. त्या दोन्ही वस्तूंच्या एकमेकांशी असलेला आकारमानातील फरक व प्रमाण लक्षात घ्या.

४. वस्तूच्या बाह्य आकाराचे भौमितिक आकारांमध्ये रेखाटन करा.

५.वस्तूच्या वैशिष्ट्यांनुसार रेषांच्या सहाय्याने त्या आकाराला योग्य वळण देऊन रेखाटन पूर्ण करा.

६. वस्तूंतील बारकाव्यांचे रेखाटन करा.

७. तयार झालेले रेखाटन आवडत्या रंगमाध्यमात रंगवून पूर्ण करा. उदा. तेलखडू, जलरंग इत्यादी.



## ठसे घेऊन वस्तूचित्र रंगवूया

तुम्ही वस्तू चित्र काढून खूप छान रंगवले. पण तुम्हांला माहीत आहे का आपल्याला वस्तूचित्र ठशाच्या सहाय्याने देखील रंगवून पूर्ण करता येते? पूर्वी आपण नक्षीकामासाठी विविध ठसे घेतले आहेत ते आठवतात ना! चला तर मग ठशांचा वापर करून चित्र रंगवू या.

१. तुमच्या वर्गातील कोणत्याही एका वस्तूचे रेखाचित्र रेखाटा. उदा. दप्तर, डबा, पुस्तक, पेन असे काहीही .

२. त्या वस्तूंच्या रंगांनुसार ठसे घेण्यासाठी जलरंगाची निवड करा.

३.निवडलेल्या वस्तूचित्रास रंगवण्यासाठी कशाचे ठसे वापरणार आहात ते निश्चित करा.

जसे की, बोटाचे ठसे, भेंडीचे ठसे, कांद्याचे ठसे, पानाचे ठसे इत्यादी.

- ठसेकामाची संकल्पना समजून द्यावी व त्याचा वापर करून वस्तू रेखाटनावर ठसे घेण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.

CG – 2,3
C –2.2, 3.1
LO– 03AE11,16

४. निवडलेल्या साहित्याचा वापर करून विविध रंगछटांच्या सहाय्याने ठसेकामातून चित्र पूर्ण करा.

५. आपले चित्र इतरांनाही दाखवून तुम्हांला आलेल्या अनुभवाचे वर्णन करा.

## कोलाजच्या माध्यमातून वस्तूचित्र

ठसेकामातून तुम्ही वस्तूचित्र छान रंगवले. आता वस्तूचित्र रंगवण्याची आणखी एक पद्धत आपण समजून घेणार आहोत ते म्हणजे कोलाज. नक्षीकामात देखील आपण कोलाज केले आहे.



कोलाज कामातून वस्तूचित्र तयार करण्यासाठी पुढील पायऱ्यांचा वापर करा.

१. निवडलेल्या वस्तूचे कागदाला शोभेल एवढ्या मोठया आकारात बाह्य रेखाटन करा.

२. वस्तूच्या रंगानुसार चिकट कामासाठी रंगीत कागद व डिंक असे साहित्य जमा करा.

३. वस्तूच्या रंगानुसार रंगीत कागदाचे हाताने तुकडे करा.

४. तयार केलेले तुकडे वस्तूवर दिसणाऱ्या रंगांनुसार वस्तूच्या रेखाटनावर चिकटवून कोलाज माध्यमातून चित्र पूर्ण करा.

## माझी कृती

- घरातील दोन वस्तू एकमेकांजवळ ठेवून त्याचे प्रमाणबद्ध वस्तूचित्र काढून रंगवा.
- आवडीच्या वस्तूचे चित्र काढून ते ठसे कामातून रंगवा.
- एका वस्तूचे वस्तूचित्र काढून ते कोलाज पद्धतीने पूर्ण करा.

- कोलाजची संकल्पना समजून सांगावी. कोलाजचे नमुने दाखवून चिकट कामातून वस्तूचित्र तयार करण्यास प्रोत्साहित करावे.

CG - 3
C - 3.1
LO- 03AE18

# ५. त्रिमितीय कलाकृती

खालील दोन्ही फोटो पहा. यामध्ये तुम्हाला काय फरक दिसत आहे यावर चर्चा करा.

१.



२.



चित्राला दोन बाजू असतात त्या म्हणजे लांबी व रुंदी. दोन बाजू असलेल्या कलाकृतीस द्विमित कलाकृती म्हणतात. तुम्ही काढलेले चित्र हे द्विमित कलाकृती झाली. आता आपल्याला त्रिमित कलाकृती तयार करायची आहे.त्रिमित म्हणजे तीन बाजू. लांबी, रुंदी आणि जाडी. त्रिमित कलाकृतीला 'शिल्प' देखील म्हटले जाते.

**नैसर्गिक घटकांपासून त्रिमित कलाकृती (शिल्प)**

घोड्याचे शिल्प पाहून ते कशापासून बनवले आहे त्या घटकांची नावे लिहा.









........................ ........................ ........................ ........................

अशा प्रकारे आपण विविध नैसर्गिक घटकांपासून त्रिमित रचना (शिल्प) तयार करू शकतो. उदा. कागद, माती, कागद, लाकूड या घटकांना 'माध्यम' असे म्हणतात.

या माध्यमांव्यतिरिक्त आपल्या परिसरातील आणखी कोणत्या माध्यमातून त्रिमित रचना (शिल्प) तयार करता येईल त्यांची यादी करा.

................ ................ ................

................ ................ ................

................ ................ ................

- परिसरातील उपलब्ध माध्यमे व साधनांचे संकलन करून घ्यावे.
- संकलित साहित्याचा वापर करून त्रिमित रचना निर्मितीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.
- संकलित साहित्यांपासून त्रिमित रचना करण्यास सांगून कलाकृतीचे वर्णन करण्यास प्रोत्साहित करावे.

CG – 3
C – 3.1
LO– 03AE19

तयार केलेल्या यादीतील माध्यमातून कोणती त्रिमित कलाकृती तयार करता येईल ते लिहा.

| माध्यम | कलाकृतीचे नाव |
|---|---|
| .................. | .................. |
| .................. | .................. |
| .................. | .................. |
| .................. | .................. |
| .................. | .................. |

### गाडी तयार करू या

तुमच्या परिसरात उपलब्ध असलेल्या माध्यमातून तुमच्या आवडीनुसार एका गाडीचे त्रिमित शिल्प तयार करा.

### दोन माध्यमांच्या साहाय्याने त्रिमित रचना

तयार केलेले त्रिमित शिल्प व ते तयार करताना आलेला अनुभव यांविषायी वर्गात चर्चा करा.

आता आपण एकाऐवजी दोन माध्यमांचा उपयोग करून त्रिमित रचना (शिल्प) तयार करू या.

- यासाठी तुमच्या परिसरात उपलब्ध असलेली पर्यावरणपूरक अशी कोणतीही दोन माध्यमे निवडा.
- त्या दोन माध्यमांपासून सुंदर अशी घराची प्रतिकृती तयार करा.
- तयार केलेली घराची प्रतिकृती त्रिमित रचना (शिल्प) आपल्या वर्ग मित्रांना व शिक्षकांना दाखवा.

## माझी कृती

**लक्षात ठेवा :**

पर्यावरणपूरक माध्यमे म्हणजे अशी माध्यमे की त्यामुळे पर्यावरण दूषित होत नाही, पर्यावरणाला हानी पोहोचत नाही.

- तुमच्या परिसरातील उपलब्ध माध्यमातून प्राणी किंवा पक्ष्याची प्रतिकृती म्हणजेच त्रिमित शिल्प तयार करा.
- तुमच्या शाळेत गटागटाने एक शिल्प पर्यावरणपूरक वस्तू/घटकांच्या माध्यमातून तयार करा. उदा. किल्ला, यंत्रमानव इत्यादी.

- परिसरातील उपलब्ध माध्यमे व साधनांचे संकलन करून घ्यावे
- संकलित साहित्याचा वापर करून त्रिमित रचना निर्मितीचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.
- संकलित साहित्यांपासून त्रिमित रचना करण्यास सांगून कलाकृतीचे वर्णन करण्यास प्रोत्साहित करावे.

CG – 3
C – 3.1
LO– 03AE19, 20,17


रंगमंच

# ६. चला अभिनय करू या

निसर्गात अनेक प्रकारचे प्राणी पक्षी आढळतात. प्रत्येक प्राणी आणि पक्षी यांचा आवाज वेगळा असतो. त्यांच्या हालचालीदेखील वेगवेगळ्या असतात. तुम्हांला काही पशुपक्ष्यांचे आवाज काढता येतील का ?

## मजेशीर खेळ खेळू या.

**खालील चित्रातील पशुपक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करा.**










## ओळखा पाहू हा कोण ?

या खेळात आपण आपल्या परिसरातील प्राणी व पक्षी यांच्या आवाजाची नक्कल करणार आहोत. तो आवाज कोणाचा आहे हे ओळखणार आहोत. यासाठी तुम्हांला माहीत असलेल्या प्राणी-पक्ष्यांचे आवाज काढा.

आता वर्गातील सर्वांनी गोलाकार बसा. तुमच्यापैकी एकाने एखाद्या प्राण्याचा किंवा पक्ष्याचा आवाज काढा. इतरांनी तो प्राणी किंवा पक्षी कोणता आहे ते ओळखा. ज्याने अचूक उत्तर दिले त्याला पुढील आवाज काढण्याची संधी द्या.

आता आपण चित्रातील पशुपक्ष्यांच्या हालचालींचीही नक्कल करू या.






- विविध प्राणीपक्षी यांची चित्रे दाखवून त्यांच्या आवाजाची व हालचालींची नक्कल करण्याची संधी द्यावी.
- प्रत्येक विद्यार्थी सहभाग घेईल याची खात्री करावी.
- दिलेले खेळ प्रत्यक्ष खेळण्याची संधी द्यावी.

CG - 4,1
C - 1.1
Lo - 03AE26
03AE27

## गंमत वस्तूंच्या आवाजाची!

आपण वेगवेगळ्या पक्ष्यांचे, प्राण्यांचे आवाज काढले आणि ओळखले देखील. प्रत्येक वस्तूचा आवाज वेगळा असतो. आता अशा आणखी कोणत्या वस्तूंचा आवाज तुम्ही ऐकला आहे त्यांची यादी तयार करा.

## आवाजांचा खेळ:

एका विद्यार्थ्याचे डोळे रुमालाने बांधा. वर्गातील कोणतीही एक वस्तू वाजवा. (उदा. कंपास उघडणे, दरवाजा उघडणे). डोळे बांधलेल्या विद्यार्थ्याने तो आवाज कशाचा आहे हे ओळखावे. जर त्याला आवाज ओळखता आला तर पुढील विद्यार्थ्याला डोळे बांधून आवाज ओळखण्याची संधी द्यावी. मात्र जर दोन संधी देऊनही त्याला आवाज ओळखता आला नाही तर त्याला कोणत्याही प्राणी / पक्षी यांच्या आवाजाची किंवा हालचालींची नक्कल करण्यास सांगावे.



- दिलेल्या क्यूआर कोडमधील आवाज विद्यार्थी बरोबर ओळखत असल्याची खात्री करावी.
- विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे आवाज करण्यास सांगून सराव करून घ्यावा.
- विविध वस्तूंचे आवाज आठवून त्यांची यादी करण्यास सांगावे.
- आवाज खेळ घेताना प्रत्येक विद्यार्थ्यास संधी मिळेल याची खात्री करावी.

CG - 1
C- 1.2
Lo- 03AE28

## करू व्यक्तींची नक्कल

आपल्या घरात, आजूबाजूला विविध वयाच्या व्यक्ती असतात. या व्यक्तींच्या आवाज व हालचालींची नक्कल आपण करून पाहू या.

उदा.



याचप्रमाणे आपल्या परिसरातील व्यावसायिक व इतर व्यक्तींच्या नकला करून पहा.

> **लक्षात ठेवा :**
> नक्कल करता येणे हे एक कौशल्य आहे. मात्र ही नक्कल इतरांना **चिडवण्यासाठी नसावी.**

## नाट्य प्रसंग सराव

आपण प्राण्यांचे, पक्ष्यांचे, वस्तूंचे आवाजाची नकला केली. काही व्यक्तींच्या आवाजाच्या, हालचालींच्या नकला केल्या. त्याचा वापर करून आपण काही छोटे प्रसंग सादर करून पाहू.

खालील काही प्रसंगातील संवाद वाचून त्यावर छोटा नाट्य प्रसंग सादर करू या.

**प्रसंग १. सकाळ झाली**

(पात्रे : चिमणी, कावळा, कोंबडा, आई आणि एक झोपलेला मुलगा)

या पात्रांची भूमिका गटात वाटून घ्या आणि खालील संवादावर अभिनय करा.

कोंबडा : कुकूचकू... कुकूचकू... अरे उठा रे, उठा. सकाळ झाली!

चिमणी : चिव... चिव... चिव...अरे पहा पहा, सूर्य दादा वर आलाय!

कावळा : काव... काव... काव ...चला, चला, कामाला लागा.

आई : मन्या, ऊठ बाळा. तुझे मित्र कधीच उठले. तू कधी उठणार?

मुलगा : आई हो ना खरंच गं... किती गोड आवाज आहेत यांचे. चला, मीपण उठतो. आता शाळेची तयारी करूया. लालललाला लालललाला

- विविध आवाजांच्या नकला करून घेऊन त्या केव्हा व कोणासाठी वापरता येतील ते विचारावे.
- कुटुंबातील व परिसरातील व्यक्तींच्या हालचालींची नक्कल करण्याची संधी द्यावी.
- नाट्यप्रसंगांचे सादरीकरण करताना सुरुवातील वाचिक अभिनय करून घ्यावा व नंतर प्रसंगाचे सादरीकरण करून घ्यावे.

CG- 1
C- 1.1
Lo- 03AE 26

काय मग मज्जा आली ना? आता खाली अजून काही प्रसंग दिले आहेत. त्यांचे गटात सादरीकरण करा.

**प्रसंग २. स्वयंपाकघरातील गडबड**

(पात्रे: कुकर, नळ, ताट आणि आई.)

नळ: टप... टप... टप... मला कुणीतरी नीट बंद करा ना रे!

कुकर: शssssss... शssssss... भाजी शिजली बरं का!

ताट: खणsss... आई गं, लागलं मला!

आई: अरे देवा, किती हा पसारा! आणि हे ताट खाली कसे पडले, कमालच झाली बाई! आधी कुकरचा गॅस बंद करते. अरे हा नळ पण चालूच का? थांब रे, बंद करते तुला नको टपटपत राहू. हं आता जरा स्वयंपाकघर बरं दिसतंय. हुश्श ....

**प्रसंग ३. नको ती खाडाखोड**

(पात्रे : पेन्सिल, पट्टी, खोडरबर, रफीक)

पेन्सिल – खर.. खर.. खर.. ए रफीक जरा नीट लिही ना.

रफीक – काय झाले, दुखलं का? मी असाच लिहितो.

खोडरबर – खोड.. खोड.. खोड.. तो असाच आहे नीट लिहित नाही आणि सारखा माझा वापर करतो.

पेन्सिल – आणि मला घेऊन पुन्हा लिहितो.

पट्टी – माझा वापर तर रेषा मारायला कमी आणि मारामारी करायलाच जास्त असतो.

रफीक – बरं बाबांनो, मी आता नीट, सावकाश, सुवाच्य लिहितो मग तर झालं?

तुमच्या इतर पाठ्यपुस्तकांतील किंवा गोष्टीच्या पुस्तकातील असे काही छोटे प्रसंग शोधून त्यावर गटागटाने सादरीकरण करा.

आपल्या गटाचे सादरीकरण करताना इतर वर्गमित्र व शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचा विचार करून पुन्हा सादरीकरण करा.

- इतर पाठ्यपुस्तक किंवा गोष्टींच्या पुस्तकातील प्रसंग निवडून प्रसंग सादरीकरणाचा सराव द्यावा. तसेच विद्यार्थ्यांना प्रसंग तयार करून सादरीकरणाची संधी द्यावी.
- प्रसंग सादरीकरणाचे निरीक्षण करून सूचना द्याव्या व त्यानुसार पुनर्सादरीकरण करून घ्यावे.

CG - 1,3
C - 1.1, 3.2
LO03AE26,36

## पुढील चित्रे पाहून ऋतूंची नावे ओळखा व लिहा.



..................................................



..................................................



..................................................

खाली काही चित्रे दिली आहेत. ती चित्रे पाहून आपण कोणत्या ऋतूत कोणते पोशाख वापरावे त्यांच्या रेषा ओढून जोड्या लावा.



**पावसाळा** **हिवाळा** **उन्हाळा**

विविध ऋतूंमध्ये वापरल्या जाणाऱ्या पोशाखांविषयी चर्चा करा.

- तिन्ही ऋतूंची वैशिष्ट्ये व त्यात वापरले जाणारे कपडे यांविषयी चर्चा करण्यास सांगावे.

CG -4
C - 4.1
LO03AE40

## प्रसंग एक – ऋतू अनेक

**प्रसंग :** शाळेची तयारी करून सकाळी शाळेला पायी जाणारा राजू. हा प्रसंग जरी एकच असला तरी तो आता वेगवेगळ्या ऋतूंमध्ये कसा घडेल हे अभिनयातून दाखवायचे आहे.



वरील प्रसंग जरी एकच असला तरी तो आता वेगवेगळ्या ऋतूमध्ये कसा घडेल हे अभिनयातून दाखवा.

## माझी कृती

१. सकाळपासून रात्रीपर्यंत घरात ऐकू येणाऱ्या पाच वेगवेगळ्या आवाजांचा सराव करून वर्गात मित्रांना ऐकवा. (उदा. सायकलची घंटी, मिक्सरचा आवाज, कुकरची शिट्टी).

२.टाकाऊ वस्तूंचा वापर करून एक वाद्य तयार करा. उदा. एका प्लास्टिकच्या बाटलीत थोडे खडे किंवा मणी भरा. बाटली हलवल्यावर होणारा आवाज अनुभवा. 'शेकर' वाद्य तयार होईल.

३. खालील पात्रांच्या चालण्याच्या नक्कला करा.

१) ऐटीत चालणारा सिंह २) घाबरलेला उंदीर

३) खेळून दमलेला मुलगा ४) बाळाचे रांगणे

४. प्रत्यक्ष वेशभूषा वापरून या प्रसंगांचे गटात सादरीकरण करा.

१) उन्हाळा – भर दुपारी बाजारातून भाजीच्या पिशव्या घेऊन घरी येणे.

२) पावसाळा – पावसात बसची वाट पाहत झाडाखाली उभे राहणे.

३) हिवाळा – रस्त्याच्या बाजूला बसलेल्या कुत्र्याच्या पिलाला घरी आणणे.

- कृती व हावभाव यांचा ताळमेळ साधला जात असल्याची खात्री करणे.
- मुलांना भावना आणि हावभाव व्यक्त करण्यावर भर द्यायला सांगावा. त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव संवादाप्रमाणे योग्य होत आहेत का ते पाहून मार्गदर्शन करावे.

CG -4
C - 4.1
LO03AE40

# ७. करू तयारी नाट्याची

नाटकाची तयारी सुरू करण्यासाठी सर्वात आधी हवी असते. एक कथा किंवा प्रसंग, ज्याला आपण 'स्टोरी' म्हणतो. त्यानंतर त्यासाठी लागणारे साहित्य व पोशाख याचा विचार करतो. प्रसंग सादर करताना तो अधिक छान दिसावा व खराखुरा वाटावा यासाठी अभिनय छान असावा तर लागतोच पण, त्याबरोबरच त्यासाठी लागणारे साहित्य, वेशभूषा, संगीतदेखील महत्त्वाचे असते. आता आपण पुढील प्रसंग वाचू या.

राजू शाळेतून धावतच घरी आला त्याने दप्तर ठेवले, डब्याची पिशवी तर टाकूनच दिली. कारण आज त्याची क्रिकेटची मॅच होती. घरात ठेवलेली बॅट आणि टोपी त्याने हातात घेतली आणि ताईला म्हणाला, "मी चाललो गं." त्यावर त्याची ताई बाहेर आली आणि म्हणाली, "अरे आताच तर घरात आलास आणि लगेच कुठे निघालास?" त्यावर राजू म्हणाला, ''आमची क्रिकेट मॅच आहे. मला ही पाण्याची बाटली भरून देतेस का?'' त्यावर ताई म्हणाली, "अरे बाहेर पावसाचे वातावरण झालेय. बघ किती अंधार झालाय. तू घरातच बसं नाहीतर आई आली की रागवेल." राजू म्हणाला, ''आमची मॅच आधीच ठरली आहे. पाऊस त्यानंतर आला. आम्ही त्याच्यामुळे आमची मॅच रद्द करू शकत नाही." तिला हसू की रागवू हेच कळेना, त्यावर ती म्हणाली "ठीक आहे पण शाळेचा गणवेश तरी बदल आणि हा टी-शर्ट घालून जा. आणि हो, ही घे छत्री पाऊस आला तर लागेल." "अगं ताई मी बॅटिंग करताना बॅट सोडून या छत्रीने बॉल मारू का ? तू पण ना...'' "हे बघ, तुला छत्री न्यावीच लागेल.'' ताई रागाने म्हणाली. इतक्यात पाऊस पडण्याचा आवाज येऊ लागला. त्यावर ताई म्हणाली ''बघ, पाऊस सुरू झाला, आता तो उघडेपर्यंत काहीतरी खाऊन घे म्हणजे खेळायला शक्ती मिळेल.''

हा प्रसंग तुम्ही लक्षपूर्वक वाचला असेलच. आता हा प्रसंग सादर करण्याआधी काही पूर्वतयारी करू या.

*** प्रसंग सादर करण्यासाठी वापराव्या लागणाऱ्या साहित्यांची यादी करूया.**

.............................. .............................. ..............................

.............................. .............................. ..............................

.............................. .............................. ..............................

हे साहित्य आपल्या परिसरात उपलब्ध होत असेल तर त्याची जमवाजमव करून सराव करा.

- प्रसंगाचे योग्य आवाजाच्या चढउतारांसह वाचन करून घ्यावे.
- प्रसंगानुरूप आवश्यक साहित्याची यादी तयार करून घ्यावी.

CG- 2
C- 2.1
Lo-03AE29

## पर्यायी साहित्याचा वापर

काही साहित्य आपली शाळा व परिसरात उपलब्ध होत नसेल तर त्यासाठी पर्यायी साहित्याचा वापर करा. जसे की,



या प्रकारे एकाच वस्तूचा कल्पकतेने वेगवेगळ्या प्रकारे वापर करता येतो.

## साहित्य निर्मिती

काही वेळेला आपल्या परिसरात उपलब्ध असणाऱ्या वस्तूंमध्ये थोडासा बदल करूनदेखील उपयोगी साहित्याची निर्मिती करता येते जसे की,

### खुर्चीपासून सिंहासन



- मुलांना परिचित वस्तू दाखवून त्या वस्तूचा कल्पकतेने नाटकाच्या सादरीकरणात कसा वापर करता येईल, त्याच्या कृती करून घ्याव्यात.

CG- 2,3
C- 2.1, 3.1
Lo-03AE30
03AE34

अशा पर्यायी किंवा तयार साधनांचा वापर करून दिलेल्या प्रसंगाच्या सादरीकरणाचा सराव करा. आपल्या इतर गटातील मित्रांना व शिक्षकांना दाखवा. शिक्षक व मित्रांनी सुचवलेल्या सुधारणा ऐकून सादरीकरणात आवश्यक तो बदल करून पुन्हा नव्याने सादरीकरण करा.

## वेशभूषा

वेशभूषा म्हणजे पोशाख. मागील प्रसंगात राजू व त्याची ताई यांचा हा प्रसंग सादर करण्यासाठी त्यांनी कोणता पोशाख करायला हवा याची यादी करूया.

| राजू | ताई |
|---|---|
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |

- एकमेकांच्या सहकार्याने ही वेशभूषा जमा करा.
- वेशभूषेहित सराव करा.
- आपल्या इतर मित्रांना हा सराव दाखवा व त्यांनी काही छान बदल सुचवले तर तसा बदल करून पुन्हा सादरीकरण करा.

## चला खेळू खेळ : पाऊस टाळ्यांचा

एकाने गटासमोर उभे राहून बोटांची संख्या खुणेने दाखवण्यास सांगावी.

इतर मुले एका बोटाची टाळी, मग दोन बोटांची, अशी हळुहळु बोटांची संख्या वाढवून दोन हातांची टाळी वाजवत राहतील. टाळ्यांचा आवाज पाऊस वाढत गेल्याप्रमाणे ऐकू येईल.

आता पुन्हा उलट क्रमाने, बोटे कमी करत येऊन शेवटी पुन्हा एका बोटाची टाळी वाजवू म्हणजे पाऊस कमी होऊन बंद झाल्यासारखे वाटेल. या खेळाची रंगत वाढवण्यासाठी सूचनेप्रमाणे बोटांची संख्या कमी जास्त करावी.

**या खेळाचा उपयोग राजू व ताईच्या प्रसंगाच्या वेळी पावसाचा आवाज काढण्यासाठी करा.**

- मुलांच्या कल्पकतेला वाव मिळावा यासाठी विविध प्रसंग, कथांचे वाचन व सादरीकरण करून घ्यावे. त्यासाठी आवश्यक वेशभूषा निवडण्याची संधी द्यावी.
- पाऊस टाळ्यांचा या कृतीसाठी अधूनमधून कमीजास्त बोटे दाखवावी व पावसाच्या बदलणाऱ्या आवाजाचा अनुभव द्यावा.

CG- 2
C- 2.1
Lo-03AE32
03AE33
03AE36
03AE37

## माझी कृती

१. थोडा विचार करा व या कंपासपेटीचा वापर वस्तू म्हणून कुठेकुठे वापर करू शकाल ते सांगा.



२. तुमच्या इयत्तेच्या पाठातील किंवा इतर विषयांच्या पाठ्यपुस्तकातील किंवा गोष्टीच्या पुस्तकातील एक प्रसंग निवडा. निवडलेल्या प्रसंगाचे सादरीकरण करण्यासाठी खालील मुद्द्यांचा विचार करा.

- पात्रांची निवड
- साहित्याची निवड
- वेशभूषेची निवड
- वर्गनाट्यगृहाची रचना
- सादरीकरण

- मुलांच्या सहभागास व कल्पकतेला वाव द्यावा.
- प्रसंग सादर करताना योग्य तेथे मार्गदर्शन करावे.

CG- 2
C- 2.1
Lo-03AE32
03AE33
03AE36
03AE37

# ८. चला रंगमंचावर

आतापर्यंत आपण नाटकाची सगळी पूर्वतयारी केली. पण हे नाटक कुठे सादर करायचे असा प्रश्न तुम्हांला पडला असेल. तर एका वर्गात असंच काहीसं घडलं ते पुढील प्रसंगातून पाहू या.

**प्राची –** सर, अहो नाटकाची सगळी तयारी झाली. पण नाटक सादर कुठे करायचे ?

**सर –** का बरं, काय झालं?

**शबाना –** शाळेच्या सभागृहात पालकसभेची तयारी सुरू आहे आणि मैदानावरचे स्टेज उन्हामुळे तापलंय. पाय भाजतील.

**सर –** अगं, मग आपल्या वर्गातच नाटक सादर करू या की, कारण आपले विद्यार्थी मित्रच आपले प्रेक्षक आहेत. ते या वर्गात आरामात बसतील.

**राजू –** सर, आपण नाटक फळ्यासमोर उभं राहून करणार आहोत ना?

**सर –** हो..

**राजू –** मग त्या फळ्यावर नाटकाला साजेसं चित्र काढायचे का?

**सर –** हो काढ की. पण तो टेबल थोडा बाजूला ठेवा म्हणजे नाटक सादर करायला छान जागा मिळेल.

**प्राची –** सर, ही बाके थोडी मागे सरकवायची का? म्हणजे संगीत देणारी मुले इथे बसतील.

**शबाना –** हो ! त्यांना त्यांचे साहित्य ठेवायला जागा लागेल ना।

**सर –** चालेल. पण, नाटक पाहणारे आपले विद्यार्थी त्यांच्या जागेवर बसून, संपूर्ण नाटक पाहू शकतील अशा प्रकारे बाकं ठेवावे लागतील.

**जॉन –** पण नाटकात वापरायचे साहित्य समोर मांडल्यावर सर्वांना आधीच दिसेल ना!

**राजू –** सर आपण ते कसे झाकायचे? म्हणजे नाटक सुरू होण्याआधी कोणालाही ते दिसणार नाही.

**अक्षरा –** सर आम्हाला सुद्धा नाटकात घ्या ना.

**सर –** अगं अक्षरा, तुमच्यासारखे अजून काही विद्यार्थी सुद्धा नाटकात भाग घेणार आहेत. तुम्हीही त्यांच्या सोबत भाग घ्या.

**अक्षरा –** पण सर आमची भूमिका कोणती? नाटक तर अर्ध्या तासात सुरू होणार आहे ना? मग आमची प्रॅक्टीस ?

- दिलेल्या संवादांचे प्रथम वाचन करून घ्यावे व प्रत्येक पात्र मुलांमध्ये वाटून देऊन संवाद घडवून घ्यावेत.

CG - 3
C- 3.2
Lo- 03AE35
03AE38

| | |
|---|---|
| सर – | तुमचा रोल आहे, पडद्याचा. |
| अक्षरा – | काय! पडद्याचा? |
| सर – | हो, मुलांच्या नाटकाचा पडदादेखील मुलांचाच. म्हणजे आता आपल्या वर्गाचे तयार होईल वर्गनाट्यगृह. |
| सर्व – | काय वर्गनाट्यगृह? |
| सर – | हो, यालाच तर 'वर्गनाट्यगृह' म्हणतात. |
| शबाना – | पण सर नाटक सुरू होण्याच्या आधीच आपले साहित्य आणि मागचा सजवलेला फळा कोणाला दिसायला नको ना! तो कसा झाकायचा? |
| सर – | त्यासाठीच करायचा हा मुलांच्या शरीराकृतीचा पडदा. रंगमंचाच्या समोरच्या भागात अशी मुले जवळ जवळ उभी करायची. म्हणजे प्रेक्षकांना मागील काहीही दिसणार नाही. मग नाटक सुरू होण्याआधी ही मुले हळूहळू डाव्या व उजव्या बाजूला सरकतील. आता सादरीकरणाचा भाग दिसू लागेल. आणि नाटक सुरू होईल. |

## मानवी शरीराकृतीचा पडदा



बंद पडदा



पडदा उघडताना

- सादरीकरण करताना पुरेशा संख्येचा विचार करून वेगवेगळे गट करा.
- प्रत्येकाला संधी मिळावी याकडे लक्ष द्यावे.

CG – 3
C– 3.2
Lo– 03AE35
03AE38

## साथ संगीताची

एखादा प्रसंग सादर करताना तो प्रेक्षकांना अजून रंजक वाटावा त्यासाठी प्रसंग सादर करताना त्याला संगीताची जोड देता येते. हे संगीतदेखील आपल्या परिसरातील अनेक वस्तूंपासून निर्माण करता येतो.

अशा अनेक वस्तूंपासून नाटकासाठी आवश्यक ध्वनी निर्माण करून संगीत देता येईल.



**आपल्यातही लपलेले आहे संगीत**

- तोंडाने वेगवेगळे आवाज काढता येतात.
- हातांनी व पायाच्या ठेक्याने ध्वनी निर्माण करता येतात.



सादरीकरणास संगीताची साथ देणारे विद्यार्थी

**तुम्हांला माहित आहे का?**

भारतीय नाट्य शास्त्राचा पाया भरत मुनींनी रचला. मराठी रंगभूमीच्या इतिहासात संगीत शाकुंतल हे पहिले संगीत नाटक मानले जाते.

### चला करून पाहू

वर्गातील विद्यार्थ्यांचे काही गट करू.

**पहिला गट** – आपल्या पाठ्यपुस्तकातील कविता/प्रसंग हावभावयुक्त सादर करूया.

**दुसरा गट** – सादरीकरण चालू असताना दुसरा गट टाळ किंवा उपलब्ध साधनांनी ठेका निर्माण करेल.

**संगीत देण्यासाठी –**

- परिसरात उपलब्ध होणारे साहित्य जमा करून त्याचा संग्रह करावा.
- जमा केलेल्या साहित्यापासून संगीत निर्माण करण्याची संधी द्यावी.

CG -3
C-3.2
Lo- 03AE37

## करू वापर प्रकाशाचा

आपण जो प्रसंग सादर करणार आहोत तो कोणत्या वेळेचा आहे ते पाहू. म्हणजे सकाळ, दुपार, रात्र असा दिवसाचा कोणता प्रहर आहे हे लक्षात घेऊ. म्हणजे तसा उजेड आपल्याला वर्गनाट्यगृहात पाडता येईल. कसे ते पाहूया.

आपल्या सर्वांना प्रकाश देणारा  आहे.
त्याचाच वापर आपण प्रकाश योजनेत केला तर किती
मज्जा येईल. आपल्या वर्गाला असतात  आणि
 त्यांना बंद करून अंधार केला की झाली 

आता हळू हळू सकाळ होताना दाखवायचे
असेल तर उघडा हळू हळू  आणि 
पण सगळेच नका उघडू. कारण सकाळी असतो मंद
प्रकाश, त्यानंतर करा पुरेसा उजेड म्हणजे होईल
दुपार.  आल्यावर सुद्धा उजेड कमीच
असतो बरं. वर्गात असते  लाईट किंवा
 त्याचा वापर सुद्धा सकाळ, दुपार व रात्र
दाखवताना  चालू बंद करून दाखवता येईल.

आता या सर्वांची मिळेल आपल्या नाटकाला साथ. त्यातील
दृश्ये वाटू लागतील खरीखुरी. प्रकाश योजनेची अनुभवता
येईल गंमत न्यारी.

- सादरीकरणाच्या सरावावेळी मुलांकडून नैसर्गिक प्रकाशाच्या वापर करता यावा यासाठी दारे खिडक्या उघडझाप करण्याचा सराव करून घ्यावा. म्हणजे योग्य वेळी कृतीचा मेळ साधता येईल.

CG -4
C - 4.1
LO03AE39

## करू वेशभूषा

एखादे सादरीकरण करण्याआधी आपण त्यासाठी वेगवेगळी तयारी करतो. त्याचा सराव करतो, आणि मग जी भूमिका करणार आहोत तसा पोशाख घालून सादरीकरण करतो. हे पाहताना आपल्या मित्रमैत्रिणींना ते खरेखुरे वाटू लागते. परंतु हा पोशाख म्हणजेच वेशभूषा निवडताना आधी गटात चर्चा करून ठरवा. मग ती वेशभूषा जमा करून आपल्या मापाची आहे का ते पहा आणि आता सरावाला सुरुवात करा. सराव करताना वेशभूषा करून सराव केला तर त्या पोशाखात चालण्याचा, बसण्याचा, उभे राहण्याचा सराव होतो व सादरीकरणाच्या वेळी आपले लक्ष सतत त्याकडे जात नाही, आणि आपले सादरीकरण अगदी छान होते.



- सादरीकरणातील पात्रांच्या वेशभुषेसह सराव करून घ्यावा.

CG -2, 3
C-3.1, 3.2
Lo- 03AE35

## चला करू सराव

आपण निवडलेल्या प्रसंगाच्या किंवा नाटकाच्या सादरीकरणाचा सराव आपल्या वर्गात करू या. यासाठी वर्गातील बैठक व्यवस्था बदलू आणि मुलांना सादरीकरणासाठी जागा करून देऊ.

- सराव करताना प्रसंगानुरूप प्रकाशयोजनेचा वापर करू या.
- सराव करताना सादरीकरणासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव करून वापर सुरू करू.
- जर साहित्य नसेल तर उपलब्ध साहित्याचा संगीत देण्यासाठी वापर करू या.
- नाटकातील पात्रांची वेशभूषा ठरवू आणि वेशभूषेसह सराव करू या.
- पडदा तयार करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांची मदत घेऊन त्यांचा सराव सुरू करू या.
- छान सादरीकरण करण्यासाठी सज्ज होऊ या.

सादरीकरण –

पुरेशा सरावानंतर वर्गनाट्यगृहाची रचना करून सरावानुसार वेशभूषा, साहित्य, संगीत, प्रकाशयोजना या तांत्रिक अंगांचा सुयोग्य वापर करून छान सादरीकरण करा.

सादरीकरणानंतर इतर विद्यार्थी व शिक्षकांनी दिलेल्या सूचनांचा विचार करून पुन्हा सादरीकरण करा.

## माझी कृती

१. पाठ्यपुस्तक अथवा गोष्टीच्या पुस्तकातील एक प्रसंग निवडून तो प्रसंग सादरीकरणासाठी –

- पात्र निवड
- आवश्यक साहित्य
- ध्वनी
- प्रकाश योजना
- वेशभूषा

या सर्व तांत्रिक बाबींचा नियोजनपूर्वक वापर करून गटात सादरीकरण करा.

- सादरीकरणासाठी आधी सराव केलेला अथवा पाठ्यपुस्तकातील, गोष्टीच्या पुस्तकातील, वयानुरूप कोणताही एक प्रसंग किंवा नाटुकले निवडण्याची संधी द्यावी.

CG –2, 3
C–3.1, 3.2
Lo– 03AE33
03AE35
03AE38


धा धीं धीं धा
संगीत



# ९. सारे मिळून गाऊ या!



आपल्या सर्वांनाच गाणी गायला किंवा ऐकायला खूप आवडते, बरोबर ना! पण तुम्हांला माहित आहे का? जेव्हा आपण सर्वजण एकत्र गातो तेव्हा त्या गाण्याची गंमत ही काही वेगळीच असते!

आज आपण अशाच काही छान गाण्यांची ओळख करून घेणार आहोत. चला तर मग सुरांच्या या सुंदर सफरीवर जाऊ आणि म्हणू या...

## राज्यगीत

राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजवण्यासाठी व महाराष्ट्राचे गुणगान गाण्यासाठी राज्यगीत गायले जाते. या गीतामध्ये महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे वर्णन केले आहे. राज्यगीताचा आदर राखण्यासाठी सावधान स्थितीत उभे राहून राज्यगीत गायन केले जाते.

### राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा॥धृ॥
भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥१॥
काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ॥२॥



गीत – राजा बढे

- तालासुरात राज्यगीताचा सराव करून घ्यावा.

CG – 1
C –1.1
LO 03AE43/57

**श्लोक** – आपल्या दिवसाची सुरुवात आनंदाने करण्यासाठी आपण देवासमोर श्लोक म्हणतो. त्यामुळे आपल्यावर चांगले संस्कार होतात. जेवणापूर्वी पुढील श्लोक म्हटला जातो.

वदनी कवळ घेता नाम घ्या मातृभूचे ।
सहज स्मरण होते आपुल्या बांधवांचे ।
कृषिवल कृषिकर्मी राबती दिवस रात्र ।
श्रमिक श्रम करोनी वस्तू या निर्मितात ।
स्मरण करून त्यांचे अन्नसेवा खुशाल ।
उदरभरण आहे चित्त होण्या विशाल ।।



**वाचा व म्हणा.**

आपण आपल्या दिवसाची, अभ्यासाची सुरुवात प्रार्थनेने केल्यामुळे आपले मन प्रसन्न होते. आपण आता ही पुढील प्रार्थना एकत्र मिळून गाऊ या.

**प्रार्थना**

प्रणाम प्रभुजी तुला आमुचा
प्रणाम प्रभुजी तुला ॥धृ॥
सूर्य चंद्र जणू दिवे विजेचे,
लटकती तारे कसे मजेचे
वीज नभातुनी तुला मिळे का ॥ १ ॥
पाऊस पडुनी शेते पिकती,
मातीमधुनी निघती मोती
सांभाळिसी मुलाफुलांना ॥ २ ॥
शक्ती, बुद्धी आम्हा द्यावी,
देश आमुचा सुखात ठेवी
हेच मागणे तुला आमुचे ॥ ३ ॥



- उपलब्ध साधनांच्या सहाय्याने श्लोक व प्रार्थना यांचा तालासुरात सराव करून घ्यावा.

CG – 1
C –1.1
LO 03AE44

शाळेची सुरुवात ही नेहमी प्रार्थनेने होते. त्यामध्ये आपण राष्ट्रगीत, राज्यगीत, श्लोक, प्रार्थना, समूहगीते एकत्रितपणे म्हणतो. त्यामुळे मन एकाग्र होते, प्रसन्न वाटते.

चला तर मग सर्व जण मिळून खालील प्रार्थना ऐकून म्हणू या.

### प्रार्थनागीत



चराचरांच्या सर्व शक्तींनो
ही आमुची प्रार्थना ।
करा अम्हांला निर्भय निर्मळ ।
उजळू द्या जीवना ।।धृ।।
विद्येवर निष्ठा ठेवू या।
उद्योगाची कास धरू या ।
साहस शिकवा संयम शिकवा ।
घडवू द्या जीवना ॥१॥

नको कधी तो गर्व यशाचा।
नको कधी आळस कामाचा ।
द्वेष कुणाचा नको कधीही।
फुलवू सहजीवना ॥२॥
रक्षण करणे या सृष्टीचे।
वाटो आम्हा अतिमोलाचे।
ममतेची आणिक समतेची ।
द्या आम्हां प्रेरणा ॥३॥

**लक्षात ठेवा :**
प्रार्थना मोठ्याने ओरडून म्हणायची नसते तर ती भावपूर्ण सुरात हळुवार म्हणायची असते.

- प्रार्थना चालीत म्हणून घ्यावी व त्यावर चर्चा करावी.
- गीताची चाल शब्दोच्चार स्वर व ताल याविषयी मार्गदर्शन करावे.

CG - 1
C -1.2
lo03AE45/46/57

## बालगीत

बालगीत गाताना तुम्ही कधी नाच केला आहे का? कोणत्या बालगीतावर तुम्हांला नाच करायला आवडते? चला तर मग आपणही निसर्गाच्या रंगात रंगून जाऊ आणि या गीताच्या माध्यमातून पक्ष्यांचा किलबिलाट, पाण्याचा खळखळाट अभिनयासह सादर करू या!

मला न कळते सारेगम
गाण्याचे संगीत
मी गातो बडबडगीत
बडबड बडबड बडबड गीत॥धृ॥

जमवून सारी वेडी पोरं
टपटप पाडून कैऱ्या-बोर
खुशाल बसतो फांदीवरती
नाही कुणाला भीत॥१॥

ओढा गाई झुळझुळ गाणी
कोकिळ गाई अमृतवाणी
आम्ही गातो त्यांच्यासंगे
तीही होती धीट॥२॥

कधी पाखरे होऊन फिरतो
कधी आईच्या कुशीत शिरतो
बालपणीचा काळ सुखाचा
हीच आमुची रीत॥३॥

कवी - जगदीश खेबुडकर



- उपलब्ध साधनांचा उपयोग करून विद्यार्थ्यांकडून तालासुरात अभिनयासह गीतगायन करून घ्यावे.
- प्रत्येकास गाण्यात सहभागी करून घ्यावे.

CG - 2
C - 2.1
LO03AE
47/57

## बालगीत

टप टप टप थेंब वाजती, गाणे गातो वारा
विसरा आता पाटी-पुस्तक
मजेत झेला गारा पाऊस आला
रे पाऊस आला ॥धृ॥

घराघरावर कौलारांवर आले झिमझिम पाणी
गुणगुणती झाडांची पाने हिरवीहिरवी गाणी
अवतीभवती भिजून माती सुगंध भरला सारा ॥१॥

काळ्याभोर ढगांना झाली कोसळण्याची घाई
इवले इवले पंख फुलवुनी गाते ही चिऊताई
आनंदे हंबरती गाई समोर विसरून चारा ॥२॥

गीत - मंगेश पाडगांवकर



- हे बालगीत टाळ्यांच्या ठेक्यावर तालासुरात म्हणण्याचा सराव करा.
- हे बालगीत गाताना तुम्हांला कसे वाटले, याबद्दल आपल्या वर्गमित्रांशी गटचर्चा करा.
- या बालगीतातील कोणत्या ओळी तुम्हांला आवडल्या त्याविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करा.



- टाळ्या वाजवून ठेक्यात व चालीत बालगीत म्हणून घ्यावे
- बालगीताविषयी काय वाटले, कोणत्या ओळी आवडल्या यावर चर्चा घ्यावी.

CG - 1/2
C - 1.1/2.2
LO 03AE
44/45/ 57

## अभिनयगीत :

केवळ गाणे न गाता त्यातल्या शब्दांचा अर्थ लक्षात घेऊन अभिनयासह गीत सादर करू या.

छोटी छोटी आम्ही बालके
मौज नि गंमत करू।
झाडे वेली फुले पाखरे
यांची मैत्री धरू॥

करू नकला आवाज काढू
पक्षी अन् प्राण्यांचे ।
गाऊ गाणे खेळ मांडू
मैदानावरचे।

बागडताना आनंदाने
अभ्यासा सावरू॥
छोटी छोटी आम्ही बालके
मौज नि गंमत करू।

कवी– राजेंद्र अत्रे



**लक्षात ठेवा :**

बालगीतांमध्ये बालकांच्या आवडीनिवडी, निसर्ग, पशुपक्षी, खेळणी इत्यादींचे वर्णन असते.

- अभिनय गीताचा सराव तालासुरासह व अभिनयासह करून घ्यावा.

CG – 2
C – 2.1
LO 03AE47/57

## देशभक्तीपर समूहगीत

आपण भारत देशात राहतो. या देशाचा आपल्याला अभिमान असायलाच हवा.या देशाचे सैनिक सीमेवर तैनात राहून सदैव देशाचे रक्षण करत असतात. म्हणूनच आपण सर्वजण सुरक्षित राहू शकतो. आता सर्वजण पुढील देशभक्तीपर गीत गाऊ या.

चला चला चला, पुढे पुढे चला
देशरक्षणा चला, ना मागुती वळा
बालवीर हे, सिंह छातीचे
ताठ मान ही, हात बाजीचे ॥१॥

हिमालयावरी, चढून जाऊ या
ध्वज तिरंगी हा, सदैव रक्षुया ॥ २॥

हाक मारिता, कोणी त्या क्षणी
रणात ठाकुया, शस्त्र घेऊनी ॥३॥

भिती ही मनी आमुच्या नसे
विजय शेवटी आपुला असे ॥ ४ ॥

कवी – प्रदीप



**खालील पैकी तुम्हाला आवडणारे एक समूहगीत ऐकून सराव करा.**

- मंगल देशा पवित्र देशा...
- बल सागर भारत होवो...
- सारे जहाँ से अच्छा...
- हिंद देश के निवासी...

**लक्षात ठेवा :**
अनेक व्यक्ती एकत्र येऊन तालासुरात गाणे गातात त्याला **समूहगीत** म्हणतात.

- देशभक्तीपर गीताचा तालासुरात सराव करून घ्यावा.

CG -3
C - 3.2
LO 03AE57

## माझी कृती

१) खालील आकृतीमध्ये पाठात आलेले विविध गीतप्रकार लिहा.




२) पाठात शिकलेले कोणते गाणे तुम्हांला खूप आवडले, त्याच्या चार ओळी लिहा.

..............................................

..............................................

..............................................

..............................................

३) पाठात शिकलेल्या कोणत्याही एका गीताचा सराव करून गायन करा.

- पाठात दिलेल्या गीतांचा पुरेसा सराव करून गटागटाने सादरीकरणाची संधी द्यावी.
- अशा प्रकारची इतर गाणी विद्यार्थ्यांकडून गाऊन घ्यावीत.



# १०. गीत एकाचे, गीत दोघांचे



**खाली दिलेल्या सर्व चित्रांचे निरीक्षण करा.**

१.



२.



३.



४.



५.



६.



वरील सर्व चित्रांचे निरीक्षण करून तुम्हांला त्यामध्ये काय सारखेपणा किंवा वेगळेपणा दिसत आहे ते तुमच्या वर्ग मित्रमैत्रिणींना सांगा.

तुम्हांला सारखे वाटणाऱ्या चित्रांचे क्रमांक खाली दिलेल्या चौकटीत लिहा.

| | | |
|---|---|---|
| | | |

- एकल व युगल गीतांची माहिती द्यावी.

CG - 2
C - 2.1
LO03AE48

जेव्हा एखादी व्यक्ती एकटीच गाणे गाते तेव्हा त्याला '**एकल गीत**' असे म्हणतात. याउलट जेव्हा दोन व्यक्ती मिळून सुरात सूर मिसळून गातात त्याला '**युगल गीत**' असे म्हणतात.

चला तर मग आज आपण एकल व युगल गीते गाऊन गाण्याची मजा घेऊ या!

**एकल गीत :**

पुढील गाणे वाचा आणि म्हणा. तुम्हांला हे गाणे एकट्याने देखील म्हणता आले पाहिजे. यासाठी गाणे ऐकून त्याचा भरपूर सराव करा.

### आनंदाचे गाणे



चला चला गाऊ चला आनंदाचे गाणे
आनंदाचे गाणे गाऊ आनंदाचे गाणे ॥धृ॥

फुलपाखरांचे पंख घेऊनी
उडू बागडू धुंद होऊनी
वाऱ्यासंगे नाचू चला छेडू या तराणे ॥१॥

फुलाफुलांचे रंग घेऊ या
झाडे जशी उंच तसे उंच होऊ या
हिरवे हिरवे रान सारे हिरवी हिरवी पाने ॥२॥

आभाळात काहीतरी नवे पाहू या
नवे नवे पाहता नवे शोधू या
गीत नवे शब्द नवे गाऊ या नव्याने ॥३॥

कवी – अच्युत ठाकूर

- उपलब्ध साधनांचा उपयोग करून तालासुरात एकल गीत गायनाचा सराव करून घ्यावा.

## बालगीत

ससा तो ससा की कापूस जसा
त्याने कासवाशी पैज लाविली
वेगवेगे धावू नि डोंगरावर जाऊ
ही शर्यत रे अपुली





चुरुचुरु बोले तो तुरुतुरु चाले
नि कासवाने अंग हलविले
ससा जाई पुढे नि झाडामागे दडे
ते कासवाने हळू पाहियले
वाटेत थांबले ना, कोणाशी बोलले ना
चालले लुटुलुटु पाही...ससा !

हिरवी हिरवी पाने नि पाखरांचे गाणे
हे पाहुनिया ससा हरखला
खाई गार चारा, घे फांदीचा निवारा
तो हळूहळू तेथे पेंगुळला
मिटले वेडे भोळे, गुंजेचे त्याचे डोळे
झाडाच्या सावलीत झोपे... ससा ।





झाली सांजवेळ तो गेला किती काळ
नि शहारली गवताची पाती
ससा झाला जागा, तो उगा करी त्रागा
नि धाव घेई डोंगराच्या माथी
कासवा तेथे पाही ओशाळला मनी होई
“निजला तो संपला!” सांगे ......ससा।

कवी – शांताराम नांदगावकर

- विद्‌यार्थ्यांकडून गाण्याचा तालासुरात सराव करून घ्यावा.

## आणखी काही एकल गीते

खाली काही गाण्यांची यादी दिली आहे. ही गाणी एकट्याने म्हणायला यायला हवीत. तुम्हाला खालील पैकी जे गाणे आवडेल ते ऐकून म्हणा व त्याचा सराव करा.

१) चांदोबा चांदोबा भागलास का?...
२) चला मुलांनो आज पाहू या शाळा चांदोबा गुरुजींची...
३) झुक झुक झुक झुक आगीनगाडी, धुरांच्या रेघा हवेत काढी...
४) लकडी की काठी, काठी पे घोडा...
५) लाल टांगा घेऊन आला लाला टांगेवाला...

## युगल गीत

आता आपण आणखी एक युगल गीत शिकणार आहोत. यासाठी पुढील गीत वाचा, ऐका आणि म्हणा.



झोप आता चिऊताई। रात्र किती झाली बाई
चिमणा-चिमणीसाठी। बाबा गातो ही अंगाई ॥धृ॥

सुरासंगती कधी खट्याळी। शाळेतील गमती
गमती अति भारी। अवखळ शोभे ही चतुराई ॥१॥



भाग्यलक्ष्मी माझी गोडंबी। माझी गुंगुडी किती सानुली
मोठ्ठं होण्याची करू नको घाई। बाबा गातो ही अंगाई ॥२॥

सरल बालपण होशील मोठी। शहाणपणाच्या करशील गोष्टी
जोजविते बापातील आई। जोजविते बाळाची आई ॥३॥

कवी- अभय कुलकर्णी

- दिलेल्या एकल व युगल गीत प्रकारांचा तालासुरामध्ये सराव करून घ्यावा.

CG - 2
C - 2.1
LO 03AE48/49

## युगल गीत

आता पुढील गाणे वाचा व ऐका. हे गाणे दोन व्यक्तींनी गायले आहे, म्हणून यास **युगल गीत** म्हणतात.

**चला तर तुम्ही देखील हे गीत वाचा, ऐका आणि म्हणा.**

''तुझ्या गळा, माझ्या गळा,
गुंफू मोत्यांच्या माळा''
''ताई, आणखि कोणाला?''
''चल रे दादा चहाटळा !''

''तुज कंठी, मज अंगठी
आणखि गोफ कोणाला?''
''वेड लागले दादाला!
मला कुणाचे? ताईला!''

''तुज पगडी, मज चिरडी।
आणखि शेला कोणाला?''
''दादा, सांगू बाबाला?
सांग तिकडच्या स्वारीला !''

''खुसूं खुसूं गालिं हसू''
''वरवर अपुले रुसू रुसू''
''चलनिघ, येथे नको बसू''
''घर तर माझे तसू तसू''

''कशी कशी, आज अशी''
''गंमत ताईची खाशी!''
''आता कट्टी फू दादाशी''
''तर मग गट्टी कोणाशी?''

कवी – भा. रा. तांबे



- युगल गीत ऐकवावे व गायनचा तालासुरात सराव करून घ्यावा.

CG – 2
C – 2.1
LO03AE48,49

## आणखी काही युगल गीते

खाली काही युगल गीतांची यादी दिली आहे. तुम्हांला आवडेल त्या गाण्यांचा ऐकून सराव करा.

- नाकावरच्या रागाला औषध काय ?
- निळे गगन निळी धरा, निळे निळे पाणी !

## माझी कृती

१) योग्य शब्द वापरून वाक्य पूर्ण करा.

अ) एकट्याने गायलेले गाणे म्हणजे ....................

आ) युगल गीत गाण्यासाठी .................... व्यक्तींची गरज असते.

२) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका एकल गीताचा सराव करून वर्गात सादरीकरण करा.

३) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका युगल गीताचा सराव करून सादरीकरण करा.

- युगल गीतांचा सराव करून सादरीकरण करून घ्यावे.

# ११. सूर परंपरेचे

चित्र पाहून ते कशाचे आहे हे लिहा.



.......................... .



........................ .



.......................... .



.......................... .



.......................... .



.......................... .

- चित्रांचे निरीक्षण करून चित्राखाली नावे लिहिण्यास सांगावे.
- चित्रातील लोकसंगीत प्रकारांची माहिती सांगावी.

CG – 2
C – 2.2
LO 03AE51

तुम्ही वासुदेव पाहिला असेल! पोवाडाही ऐकला असेल! तर कधी जात्यावरच्या ओव्यादेखील ऐकल्या असतील! अशाच अनेक स्थानिक बोलीभाषा, परंपरांतून लोकसंगीत तयार होते. आज आपण लोकसंगीतातील अशाच काही गीतांचा आनंद घेऊ!

**वाचा, ऐका व म्हणा.**

**शेतकरी गीत**



आम्ही लेकर काळ्या आईची
राबतो शेतामंदी। करितो काम गाळतो घाम
राहतो सदा आनंदी ॥ धृ ॥
जरी आमचं कष्टाचं जीणं
दैवाचे आम्हाला लाभत देणं
ऊन-पावसाशी झुंजून आम्ही
पिकवितो सोनं चांदी ॥१॥

कवी -राजेंद्र अत्रे

**लक्षात ठेवा :** शेतकरी गीतासाठी विशेषतः ढोल, खंजिरी, झांज व घुंगरू ही वाद्ये वापरली जातात.

**कोळीगीत**



वल्हव रे नाखवा, वल्हव रे नाखवा
वल्हव रे नाखवा, वल्हव
आम्ही कोळ्याची पोरं हाय् हो
आम्हा दर्याची भीती नाय हो
वर आभाळ भरलंय् हो जाळं जोरात धरलंय् हो
कोण करील आम्हा काय हो?
लाट जोसात येऊ द्या झेप खुशाल घेऊ द्या
मागे घेणार न्हाई पाय हो
देव मल्हारी पावला हो मासा जाळ्यात गावला हो
होडी मजेत पुढे जाय हो

कवी - मंगेश पाडगांवकर

**लक्षात ठेवा :** कोळी गीतासाठी विशेषतः ढोलक, ढोलकी, घुंगरू, हार्मोनियम, झांज ही वाद्य वापरली जातात.

- कोळीगीत व शेतकरी गीत यावर चर्चा घेऊन त्यातील फरकाविषयी गटात चर्चा करण्यास सांगावे.

CG-2
C- 2.2
LO03AE
50/51

### वाचा, ऐका व म्हणा.

पूर्वी कुटुंबातील स्त्रिया पहाटे उठून जात्यावर दळण दळत. दळण दळताना त्या ओव्या म्हणायच्या, या ओव्यांना जात्यावरच्या ओव्या म्हणतात.

### जात्यावरील ओव्या

१) पहिली माझी ओवी गं, लावीन मी माळा।
विठूच्या चरणी गं, ठेवीन मी कपाळा।

२) सुंदर माझे जाते गं फिरे बहुतेकें ।
ओव्या गाऊ कौतुके तू येरे बा विठ्ठला ॥



### पोवाडा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकल्या असतील. पण जेव्हा या गोष्टी गाण्याच्या स्वरूपात ऐकतो तेव्हा त्यातील घटनांची कल्पना येते. असाच एक पोवाडा ऐका व म्हणा.



रायरीचा रायगड झाला ऽऽऽ
बांधीले दुर्गेश्वराला, तटबंदी महाद्वाराला
बाजारपेठ राजसदरेला, सेवेचे ठाई तत्पर
हिरोजी इंदुलकर वर देई जगदिशेश्वर
झाली राजधानी तैयार जी ऽ जी जी
मराठीयांच्या सिंहासनाची वाढविली ख्याती
जिजाऊ झाल्या राजमाता अन् शिवबा छत्रपती
कित्येकांच्या बलिदानाने दिन हा अवतरला
शेतकऱ्यांचा  राजा शिवबा छत्रपती झाला

कवी – संतोष साळुंके

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोणकोणत्या शौर्यकथा माहीत आहेत, त्यावर चर्चा करा.

**लक्षात ठेवा :** पोवाडा सादरीकरण करताना डफ, हार्मोनिअम, तुणतुणे, टाळ अशी वाद्ये वापरली जातात.

- लोकसंगीतासाठी वापरण्यात येणाऱ्या वाद्यांचा परिचय करून द्यावा.
- स्थानिक परिसरातील लोकगीत प्रकारांची ओळख करून द्यावी.

CG -4
C- 4.2
LO03AE61

## भारूड

गाण्यातून गोष्ट सांगताना अभिनय करत सादर करताना खूप मजा येते. अशाच गीत प्रकारांना भारूड असे म्हणतात.

सूर्य उगवला प्रकाश पडला आडवा डोंगर
आडवा डोंगर तयाला माझा नमस्कार
अगगगगगगं विंचू चावला
देवा रे देवा ...विंचू चावला
आता काय मी करू ... विंचू चावला

– संत एकनाथ

**लक्षात ठेवा :** भारूड सादरीकरणासाठी हार्मोनियम, ढोलकी, मृदुंग, टाळ, तुणतुणे अशी वाद्ये वाजवली जातात.



**लक्षात ठेवा :**
स्थनिक बोलीभाषेमध्ये गायल्या जाणाऱ्या पारंपरिक गीतांना '**लोकगीते**' असे म्हणतात.

- लोकगीतातील साहित्याची ओळख करून द्यावी.
- लोकसंगीतातील विविध प्रकार मुलांकडून गाऊन घ्यावेत.
- लोकगीत प्रकारातील फरक ओळखण्यास सांगावे.

CG -3/4
C- 3.2/4.2
LO03AE
56/61

**प्रासंगिक गीते.**

वर्षभरात येणाऱ्या अनेक सण उत्सवांमध्ये त्या त्या सणांनुसार गीतांचे सादरीकरण करतात त्याला प्रासंगिक गीते असे म्हणतात.

**भजन :**

देव माझा विठू सावळा
देव माझा विठू सावळा
माळ त्याची माझिया गळा॥धृ॥

विठु राहे पंढरपुरी वैकुंठच हे भूवरी
भीमेच्या काठी डुले भक्तिचा मळा॥१॥

साजिरे रूप सुंदर कटि झळके पीताम्बर
कंठात तुळशीचे हार, कस्तुरी-टिळा॥२॥

भजनात विठू डोलतो कीर्तनी विठू नाचतो
रंगुन जाई भक्तांचा पाहुनी लळा॥३॥

कवी- सुधांशू



- प्रासंगिक गीतप्रकारांचा सराव करून घ्यावा.

CG - 3
C- 3.2
LO03AE57
LO03AE58

**गौरी – गणपती :**

चला चला गं सयांनो गौरी आणू या
गौरी आईचं गाणं गाऊ या
चला चला गं...

पाट मांडू चला माझ्या गौराईला शालू
जरतारी हा आता देऊ तिला
सोन्या पाचूचं दागिनं तिला घालू या
चला चला गं सयांनो गौरी आणू या...

हळदी कुंकू फुलं गंध वाहू तिला
गौराईच्या दारी दीप लाऊ चला
आली गौराई माझी सोन्याच्या पाऊली
चला चला गं सयांनो गौरी आणू या..



**दिवाळी गीत :**

चक चक चकली काट्याने माखली
तुकडा मोडताच खमंग लागली
कड कड कडबुळे कुडकुडीत झाले
एकच खाताना दात दुखू लागले
गोरीपान करंजी, नावे सारखी दिसते
तिच्या पोटातले खाताना, आणखी हवी वाटते
तिखट तिखट चिवडा, आम्हांला नको बुवा
'दाणे खोबरं वेचून, लाडू ऐवजी दादाला द्या
एवढा मोठा लाडू, हातात काही मावत नाही
तुकडा तुकडा खाताना, केव्हा संपला कळत नाही.



प्रासंगिक गीत प्रकारांचा तालासुरात सराव करून घ्यावा.

CG -3
C- 3.2
LO03AE57
LO03AE58

## माझी कृती

१) पाठात आलेल्या लोकगीत प्रकारांची नावे लिहा.

**लोकसंगीताचे प्रकार**

२) खालील चित्रातील वाद्ये कोणत्या लोकसंगीत प्रकारांसाठी वापरतात ते लिहा.



.......................



.......................



.......................



.......................



.......................



.......................

३) गावातील किंवा परिसरातील लोकगीतांची घरातील मोठ्या व्यक्तींकडून माहिती घेऊन यादी तयार करा.



# १२. मैत्री सुरांशी



खालील चित्रे पहा.

     

चित्रातील आवाज समजून घ्या व त्या आवाजांचे वर्गीकरण करा.

| नैसर्गिक आवाज | मानवनिर्मित आवाज |
|---|---|
| १) .................................. | १) .................................. |
| २) .................................. | २) .................................. |
| ३) .................................. | ३) .................................. |

वरील आवाजांव्यतिरिक्त तुम्हांला माहीत असणारे इतर नैसर्गिक व मानवनिर्मित आवाज लिहा.

**लक्षात ठेवा :**

- निसर्गातील विविध घटकांच्या आवाजांना नैसर्गिक ध्वनी म्हणतात.
- वस्तूंपासून येणाऱ्या आवाजाला मानवनिर्मित ध्वनी म्हणतात.

## विचार करा

| नैसर्गिक आवाज | मानवनिर्मित आवाज |
|---|---|
| १) .................................. | १) .................................. |
| २) .................................. | २) .................................. |
| ३) .................................. | ३) .................................. |

**करूया आवाजाची नक्कल!**

आपल्या मित्रांसमोर तुम्ही ऐकलेल्या आवाजांची नक्कल करून दाखवा.

- नैसर्गिक व मानवनिर्मित आवाजांतील फरक समजावून सांगावा.
- विविध नैसर्गिक व मानवनिर्मित आवाजांची नक्कल करण्याची संधी द्यावी.

CG - 3
C - 3.1
LO03AE54/55/59







वरील चित्रांमध्ये तुम्हाला काय दिसते ?
गायनासाठी वादनाची गरज असते त्याचप्रमाणे नृत्यासाठी गायक व वादकाची गरज असते.

**लक्षात ठेवा :**
**गायन, वादन व नृत्य या तीन कलांच्या समूहास 'संगीत' असे म्हणतात.**

## आरोह – अवरोह

**खालील चित्राचे निरीक्षण करा व त्यावर गटात चर्चा करा.**




**लक्षात ठेवा :**

- चढत्या क्रमाने स्वर गाण्याच्या क्रियेला 'आरोह' म्हणतात. उदा. सा रे ग म प ध नि सां
- उतरत्या क्रमाने स्वर गाण्याच्या क्रियेला 'अवरोह' असे म्हणतात. उदा. सां नि ध प म ग रे सा

- उपलब्ध साधनांच्या सहाय्याने आरोह अवरोह यांचा सराव करून घ्यावा.

CG – 2
C – 2.2
LO03AE52



**चित्र पहा व निरीक्षण करा.**

चित्रातील हारांमध्ये काय काय फरक दिसतो त्यावर गटात चर्चा करा.

**सातस्वर**

संगीतामध्ये सात स्वर असतात. या स्वरांची रचना वेगवेगळ्या पद्‌धतीने करता येतील का? याचा विचार करा.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| सा | रे | ग | म | प | ध | नि |

**तुम्हाला माहित आहे का?**

- सात स्वरांच्या समूहास '**सप्तक**' असे म्हणतात.
- सप्तकाचे मंद्र, मध्य व तार असे एकूण तीन प्रकार आहेत.
- वरचा **सां** घेतल्याशिवाय सप्तक पूर्ण होत नाही.

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **आरोह –** | सा | रे | ग | म | प | ध | नि | सां |

| | ८ | ७ | ६ | ५ | ४ | ३ | २ | १ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अवरोह –** | सां | नि | ध | प | म | ग | रे | सा |

- आरोह, अवरोह व अलंकार यांचा सराव करून घ्यावा.

CG – 2
C – 2.1
LO03AE53/56

**खालील रिक्त जागा भरून स्वर क्रम पूर्ण करा.**

| १ | १ | २ | २ | ३ | ३ | ४ | ४ | ५ | ५ | ६ | ६ | ७ | ७ | ८ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | | रे | | ग | | म | | प | | ध | | नि | | सां | |

| ८ | ८ | ७ | ७ | ६ | ६ | ५ | ५ | ४ | ४ | ३ | ३ | २ | २ | १ | १ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सां | | नि | | ध | | प | | म | | ग | | रे | | सा | |

**करून पहा**

**खालील स्वर क्रम पूर्ण करा व गाण्याचा सराव करा.**

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | रे | रे | ग | | | | | | | | | | |
| सां | नि | नि | ध | | | | | | | | | | |

**लक्षात ठेवा :** स्वरांच्या क्रमबद्ध आकर्षक रचनेला **अलंकार** म्हणतात.

## वाद्यांची ओळख


हार्मोनियम


तबला


बासरी


पखवाज


गिटार


ढोल


तुतारी


संबळ

- टाळीच्या सहाय्याने अलंकारांचा तालासुरात सराव करून घ्यावा.

CG - 2
C -2.2
LO03AE53

**चित्रांचे निरीक्षण करून त्यांच्या वाजवण्याच्या पद्धतीनुसार वर्गीकरण करा.**

१. हाताने वाजणारे वाद्य. ..........................................................

२. तोंडाने फुंकून वाजणारे वाद्य..........................................................

३. तारांच्या सहाय्याने वाजणारे वाद्य..................................................

## माझी कृती

१) खालील रिकाम्या चौकटीत क्रमाने येणारे स्वर लिहा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सा | | ग | म | | ध | |

२) शाळेत येताना कोणकोणते नैसर्गिक व मानवनिर्मित ध्वनी ऐकू येतात.

| नैसर्गिक आवाज | मानवनिर्मित आवाज |
|---|---|
| १) .................................... | १) .................................... |
| २) .................................... | २) .................................... |
| ३) .................................... | ३) .................................... |

# नृत्य



# १३. नृत्य, माझा आनंद

मुलांनो, आपल्याला खूप आनंद झाला की आपण आनंदाने टाळ्या वाजवतो, उड्या मारतो आणि कधी कधी आनंदाने नाचू लागतो. यापूर्वी देखील कधी ना कधी

आपण एखाद्या गाण्यावर नाच केला असेल. तर मग आता आपण सुंदर नृत्य करायला शिकणार आहोत. चला तर मग सुरू करू या नृत्याचा आनंदी प्रवास...

नृत्य म्हणजे भाव व संगीत यांच्या आधारे केली जाणारी हात,पाय व संपूर्ण शरीराची लयबद्ध व सुंदर हालचाल होय.

चित्रात दिलेल्या कृतींचे निरीक्षण करून दिलेल्या चित्रातील कृती एकामागोमाग एक करून पाहूया. या कृती प्रत्येकाने तालात करायच्या आहेत.



**१. खाली वर टाळ्या वाजवणे.**



**२. टाळ्या वाजवून पाऊल पुढे टाकणे.**
**टाळ्या वाजवून पाऊल मागे टाकणे.**



**३. उजव्या व डाव्या बाजूला टाळ्या वाजवणे.**

## चला नाचूया!

वरील चित्रात दिलेल्या कृतींचा वापर करून तुमच्या आवडीच्या गाण्यावर नृत्य सादर करा. या कृतीसोबतच तुमच्या आवडीनुसार उड्या व इतर हालचालींचा समावेश करा.

- दिलेल्या हालचालींचे निरीक्षण करून, त्या आवडीच्या संगीतावर प्रत्यक्ष करून बघण्यासाठी प्रेरित करावे. आवडींच्या कृतींव्यतिरिक्त इतर सोप्या हालचाली करून घ्याव्यात.
- प्रत्येक विद्यार्थी या कृतीमध्ये सहभागी होईल याची खात्री करावी.

CG – 1
C – 1.1
LO 03AE62

## पाहू या ! शिकू या ! नाचू या !









दिलेल्या प्रत्येक हालचालींचे निरीक्षण करून प्रत्येक नृत्य हालचाल डाव्या व उजव्या बाजूला करा.

चला आता या नृत्याचा सराव करू या.

- नृत्याचा सराव तसेच सादरीकरण करायला प्रोत्साहन द्यावे.

CG – 1
C – 1.1
LO 03AE62

## सारे मिळून नाचूया.

सर्व जण एकत्र मिळून नृत्य केल्यामुळे आनंदाचे व ऊर्जात्मक वातावरण होते.
चित्रात दिलेल्या कृतींचे निरीक्षण करा व त्याप्रमाणे कृती एकामागोमाग एक करून बघा.

**मित्रमैत्रिणींसोबत गोलात फिरा !**



**टाळी वाजवा, समोरच्याला टाळी द्या.**



**फुगडी घाला !**



**टाळी वाजवा, २ पाऊले पुढे जा**
**टाळी वाजवा, २ पाऊले मागे या.**



**नाव वल्हवण्याची कृती करा.**



**एका गटाने टाळ्या वाजवा,**
**एका गटाने पाय आपटा.**



## चला नाचूया!

आता आपण पुरेसा सराव केला आहे तर वरील चित्रांत दिलेल्या कृतींचा वापर करून तुमच्या आवडीच्या गाण्यावर नृत्य सादर करा.

- दिलेल्या हालचालींचे निरीक्षण करून, आवडीच्या संगीतावर प्रत्यक्ष करून बघण्यासाठी प्रेरित करावे.

CG – 1
C – 1.2
LO 03AE63

### चला करून पाहु या!



सर्वांनी एका ओळीत थांबा. सगळ्यांनी उजव्या बाजूला वळून आपले दोन्ही हात समोरच्या मित्र/मैत्रिणीच्या खांद्यावर ठेवा. सर्वात पुढे असलेल्या मित्राप्रमाणे चाला. त्यातील हालचालींचे अनुकरण करा.



| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| पुढे | मागे | पुढे | मागे | पुढे | मागे |

आता ४ ते ६ विद्यार्थ्यांचा एक गट तयार करू या. गटातील सर्वांनी एका ओळीत थांबा. १, ३, ५ या क्रमांकावर उभ्या असलेल्या मुलांनी आधी समोर उडी मारा व मागे जा. २, ४, ६ आकड्यांवर उभ्या असलेल्या मुलांनी आधी मागे जा, मग समोर उडी मारा. पहा पुन्हा एका रेषेत आपण सर्व जण आला असाल. आता याचा सराव करा. आता पुरेसा सराव झाल्यानंतर तुमच्या आवडीच्या गाण्यावर या हालचालींचा वापर करून नृत्य सादर करा.

- दिलेल्या हालचालींचे निरीक्षण करून आवडीच्या संगीतावर प्रत्यक्ष करण्यासाठी प्रेरित करावे.
- वर्गातील विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन चार किंवा सहा विद्यार्थ्यांचे गट करून ही कृती घ्यावी.

CG – 1
C – 1.2
LO 03AE63

### चित्र चिकटवा नृत्याचे !

वर्तमानपत्र अथवा मासिकात आलेले समूहनृत्याचे चित्र किंवा शालेय कार्यक्रमात तुम्ही सादर केलेल्या समूहनृत्याचे चित्र वहीत चिकटवा.

> **लक्षात ठेवा**
>
> जेव्हा अनेक मुले किंवा कलाकार एकत्र येऊन नृत्य करतात तेव्हा त्याला 'सामूहिक नृत्य' असे म्हणतात.

### खेळू या खेळ – नेता ओळखा.

आता आपण सर्व जण एक खेळ खेळूया. यासाठी सर्वांनी वर्तुळाकार बसावे. एका विद्यार्थ्यावर राज्य द्यावे. त्याला बाजूला पाठवून गोलातील सर्वांनी मिळून त्यांचा एक नेता ठरवावा. नेता ज्याप्रमाणे कृती करेल त्याप्रमाणे इतर सर्वांनी हालचालींचे अनुकरण करावे. नेत्याने नकळतपणे हालचाली बदलत जाव्यात. ज्याच्यावर राज्य आहे त्याने गटाचा नेता ओळखणे अपेक्षित आहे. नेता ओळखल्यास त्या नेत्याने पुढील राज्य घ्यावे. अशा प्रकारे खेळ सुरू ठेवावा.



## माझी कृती

आतापर्यंत शिकलेल्या सर्व नृत्य हालचालींचा आपल्या कल्पनेनुसार एकत्रित वापर करून तुमच्या आवडीच्या गाण्यावर नृत्य बसवून सादर करा.

- वर्तमानपत्र अथवा मासिकांचे निरीक्षण करण्यास सांगावे व त्यामधील समूहनृत्याची चित्रे ओळखायला सांगून ते छायाचित्र वहीत चिकटवायला सांगावे.
- नेता ओळखा हा खेळ वर्गात खेळून घ्यावा.
- शिकलेल्या सर्व नृत्य हालचालींचा एकत्रित वापर करून सादरीकरण करायला प्रोत्साहन द्यावे.

CG – 1
C – 1.2
LO 03AE63

# १४. नृत्यमय जीवन



दैनंदिन आयुष्यात आपल्या हाताचा वापर विविध कामे करण्यासाठी विविध पद्धतीने करत असतो. हातांच्या तळव्याचा, बोटांचा वापर सुंदर नृत्यात्मक हालचालींसाठीही केला जातो.अशा हातांच्या नृत्यात्मक हालचालींची ओळख करून घेऊ या.

## आपल्या हाताच्या बोटांची ओळख करून घेऊ या.




## चला कल्पना करू या !

आपण आपल्या हाताचा तळवा वेगवेगळ्या पद्धतीने ठेवून बघा. उदा. हाताचा तळवा आकाशाकडे आहे, हाताचा तळवा खालच्या बाजूच्या दिशेला आहे. अशाच प्रकारे हाताची बोटे, हात यांच्याद्वारे कोणकोणत्या हालचाली करता येतील यावर वर्गात चर्चा करा.

आपल्या हाताच्या तळवा व बोटांचा विविध पद्धतीने वापर करून वेगवेगळे प्राणी अथवा पक्षी दाखवण्याचा प्रयत्न करा.(उदा. मोर, पोपट, हरीण, सिंह व मासा इत्यादी.)

## हस्तमुद्रांचा वापर समजून घेऊ या !

नृत्यामध्ये हाताचा वापर करून वेगवेगळ्या क्रिया अथवा वस्तू दाखवल्या जातात, त्यांना 'हस्तमुद्रा' असे म्हटले जाते.

पुढील पानावर दिलेल्या हस्तमुद्रांचे निरीक्षण करा. दैनंदिन जीवनात या हस्तमुद्रांचा आणखी कसा वापर करता येईल याची वर्गात चर्चा करून ते लिहा.

- दिलेल्या हस्तमुद्रांचे निरीक्षण करायला सांगून, त्या प्रत्यक्ष करायला सांगाव्यात व कल्पनाशक्तीचा वापर करून त्याच हस्तमुद्रांचा वापर दैनंदिन जीवनात कसा होतो यावर चर्चा करण्यास सांगावे.

CG – 2,
C –2.1,
LO 03AE64

**१.पताक हस्त**





.................................
.................................
.................................
.................................

**२.हंसास्य हस्त**





.................................
.................................
.................................
.................................
.................................

**३. मुष्टी हस्त**





.................................
.................................
.................................
.................................
.................................

- दिलेल्या हस्तमुद्रांचे निरीक्षण करायला सांगून, त्या प्रत्यक्ष करायला सांगाव्या व पुढे कल्पनाशक्तीचा वापर करून त्याच हस्तांचा वापर दैनंदिन जीवनात कसा होतो ते विचारावे.

CG – 2,
C –2.1,
LO 03AE64

निसर्गातील विविध घटकांच्या हालचाली पाहिल्या तर त्या हालचालींचे रूपांतर सुंदर नृत्य हालचालींमध्ये करता येऊ शकते. उदा. झाड वाऱ्यावर डोलणे, नदीचे वाहणे, माशाचे पोहणे इ. निसर्गातील विविध घटकांचे व त्यातील हालचालींचे निरीक्षण करा.



पाऊस



नदी



पोहणारा मासा



फूल



उडणारा पक्षी



डोलणारे झाड

वर दिलेल्या चित्रांतील नैसर्गिक घटक पहा! या घटकांच्या हालचालींची कल्पना करा. या हालचाली आता नृत्यासाठी कशा वापरता येतील याची कल्पना करून त्या हालचाली लयबद्धपणे करून पहा.

- निसर्गातील विविध घटकांचे निरीक्षण करण्यास सांगून त्यानुसार हालचालींचे अनुकरण करण्यास सांगावे.

CG – 4,
C –4.1,
LO 03AE70

## चिठ्ठीत काय लिहिले आहे?

आता आपण एक छानसा खेळ खेळू या. यासाठी आपण काही विद्यार्थ्यांचा गट तयार करू या. आता गटात जेवढे मित्रमैत्रिणी आहेत तेवढ्या निसर्गातील विविध घटकांच्या हालचाली लिहिलेल्या चिठ्ठ्या तयार करा. एकाने गोलात सर्व चिठ्ठ्या टाका. गटातील प्रत्येकाने एकेक चिठ्ठी उचला.

तुम्ही उचललेल्या चिठ्ठीमध्ये जो निसर्ग घटक असेल तो समजून घेऊन त्या घटकाच्या हालचालीची तुमच्या कल्पनेप्रमाणे नृत्यमय हालचाल करून दाखवा.

## नाचू डोलू निसर्गासंगे

छान! आतापर्यंत आपण निसर्गातील विविध घटकांच्या छान छान हालचाली करून पाहिल्या. आपण छान पद्धतीने त्याचा सरावदेखील केला आहे.

चला तर मग आता आपण एका निसर्गगीतावर आधारित एक नृत्य करून पाहू या.

पुढील निसर्गगीत वाचा. दिलेल्या नृत्याचा गटात सराव करून वर्गात सादरीकरण करा.



- निसर्गघटकांशी संबंधित हालचालींच्या चिठ्ठ्या तयार करून सूचनेप्रमाणे खेळ घ्यावा.

CG – 4,
C – 4.1,
LO 03AE70

## किलबिल किलबिल पक्षी बोलती!

किलबिल किलबिल पक्षी बोलती!
झुळझुळ झुळझुळ झरे वाहती,
पानोपानी फुले बहरती,
फुलपाखरे वर भिरभिरती.
स्वप्नी आले काही,
एक मी गाव पाहिला बाई!॥धृ॥
त्या गावाची गंमत न्यारी,
तिथे नांदती मुलेच सारी.
कुणी न मोठे, कुणी धाकटे,
कुणी न बसते इथे एकटे.
सारे हसती, गाती नाचती,
कोणी रडके नाही.
एक मी गाव पाहिला बाई! ॥१॥

कवी– शांता शेळके



## माझी कृती

तुमच्या आवडीचे निसर्गगीत किंवा बालगीत निवडा. निवडलेल्या गाण्यावर गटाने आपल्या कल्पकतेने नृत्य सादरीकरण करा.

- शिक्षकांनी वर्गात नृत्याचे प्रात्यक्षिक घडवून आणवे. विद्यार्थ्यांच्या नृत्यात्मक हालचालींचे निरीक्षण, सराव व सादरीकरण करण्यास प्रोत्साहन द्यावे.

CG – 4,
C –4.1,
LO 03AE70

# १५. नृत्याचे सोबती



आपण नृत्य करताना संगीताचा वापर करतो. संगीतामध्ये गाण्यासोबतच लय आणि ताल यांचाही समावेश असतो. संगीतासोबतच नृत्यासाठी लय आणि ताल हे खूप महत्वाचे असतात.

चला तर आपण लय व ताल यांच्याविषयी जाणून घेऊ या.

आपल्या दैनंदिन जीवनात तसेच निसर्गामध्ये लय असते. घड्याळामध्ये तीन काटे असतात —– तास काटा, मिनिट काटा आणि सेकंद काटा. तास काटा मंद गतीने, मिनिट काटा मध्यम गतीने आणि सेकंद काटा जलद गतीने फिरतो. या गती म्हणजे लय. दोन ठेक्यातील समान अंतर म्हणजे लय. लय म्हणजे वेग किंवा गती. लयीचे तीन प्रकार आहेत .

## लय

१. विलंबित लय – हळू गती

२. मध्य लय – मध्यम गती

३. द्रुत लय – जलद गती



विलंबित लय – हळू गती



मध्य लय – मध्यम गती



द्रुत लय – जलद गती

- लय ही संकल्पना वेगवेगळ्या उदाहरणातून समजून सांगणे
- लयीची कृती एकट्याने किंवा गटाने समजून घेता येऊ शकते.

CG – 2
C – 2.2
LO 03AE65

## लयींची गंमत!

या तीन लयींशी संबंधित कृती करूया.

### १. विलंबित लय – हळू गती

१ ते ४ संख्या क्रमाने म्हणा फक्त १ ही संख्या म्हणताना टाळी वाजवा.

१. 

२. X

३. X

४. X

### २. मध्य लय – मध्यम गती

१ ते ४ संख्या क्रमाने म्हणा. आता १ व ३ म्हणताना टाळी वाजवा.

 १.

X २.

 ३.

X ४.

### ३. द्रुत लय – जलद गती

१ ते ४ संख्या क्रमाने म्हणा. १, २, ३ व ४ प्रत्येक अंक म्हणताना टाळी वाजवा.

 १.

 २.

 ३.

 ४.

चित्रात दाखवल्याप्रमाणे वेगवेगळ्या लयींत टाळ्या वाजवा.

आता या तिन्ही गतींपैकी एक गती निवडून त्यानुसार हातांच्या नृत्यात्मक सोप्या हालचाली कराव्यात. त्यानंतर गती बदलून त्याच हालचाली वेगवेगळ्या लयीत करून पाहाव्यात. जसे हात पंखासारखे हालवणे, चुटक्या वाजवणे.

- वरील कृतीचे विद्यार्थ्यांना निरीक्षण, अनुकरण व सराव करण्यास प्रेरित करावे.

CG – 2
C – 2.2
LO 03AE65

## ताल

ताल म्हणजे गाण्याला किंवा वादनाला दिलेली एक वेळेची चौकट. ताल हा ठेक्याने मोजला जातो. उदा. केहेरवा ताल – मात्रा ८; बोल – धा गे ना ती ना क धी न

### लय तालाची गंमत!

केहेरवा विलंबित, मध्य व द्रुत या तीन लयींचा वापर करून केहेरवा ताल म्हणून बघा. तालातील प्रत्येक अक्षर म्हणताना दोन्ही हाताने टाळी वाजवा किंवा एक पाय जमिनीवर आपटून ठेका द्या.

### ताल केहेरवा कृती

आता हा केहेरवा ताल आपण गटात लयीत म्हणणार आहोत. यासाठी या बोलातील आठ अक्षरांसाठी आठ मित्र–मैत्रिणींचा एक गट तयार करा. प्रत्येकाला एक अक्षर क्रमाने वाटून द्या.

तालातील बोलाप्रमाणे आपापले अक्षर निवडलेल्या गतीने म्हणा. हे करताना सर्वांनी ठरवलेल्या गतीने बोल म्हणण्याचा सराव करा.

ताल केहेरवा आणखी एका पद्‌धतीने म्हणून पाहू या.




- केहेरवा ताल विविध लयीत म्हणण्याचा सराव करून घ्यावा.
- तालातील अक्षरे उच्चारणे व टाळी किंवा पाय आपटणे ही क्रिया एकत्र होते आहे का त्याचे निरीक्षण करावे तसेच प्रत्येक बोल एकामागोमाग एक एकाच लयीत म्हंटला जातोय का याकडे लक्ष द्यावे.

CG – 2
C – 2.2
LO 03AE65

## वाद्य

नृत्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध वाद्यांची ओळख करून घेऊया!

दिलेल्या वाद्यांची चित्रे पहा. आवाज ऐका व ते कुठल्या नृत्यासाठी वापरले जातात यावर गटात चर्चा करा.



तबला



घुंगरू



लेझीम



डफ



मृदंग



टाळ



ढोलकी



हार्मोनियम

- वाद्यांची चित्रे पाहून त्यांचा आवाज व नृत्यासाठीचा वापर – यावर वर्गात चर्चा करावी.
- विविध नृत्य प्रकारांबद्दल माहिती देऊन त्यामध्ये कोणती वाद्ये वापरली जातात हे सांगावे.

CG – 3
C – 3.1
LO 03AE66

## परिसरातील वाद्ये

सभोवतालच्या परिसरात पाहिलेल्या वाद्यांच्या नावांची यादी तयार करा.

...................... ......................

...................... ......................

...................... ......................

## चला चित्र काढू या!

तुम्हाला माहीत असलेल्या वाद्यांचे आकार समजून घेऊन चित्र काढा.

## चित्रात वाद्ये शोधा आणि नावांच्या व चित्राच्या रेषेने जोड्या जुळवा.

तबला

मृदंगम्

ढोल

ढोलकी

ताशा



बासरी

टाळ

झांज

हार्मोनियम

घुंगरू

**लक्षात ठेवा :**

नृत्य करताना आपण हालचाली, भाव आणि ताल यांचा उपयोग करतो. यामुळे आपली सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढतो.

- वाद्यांचे आकार समजून घेऊन सोप्या पद्धतीने चित्रे काढण्यास सांगावे.
- चित्रातील वाद्ये ओळखण्यास सांगून नावांच्या व चित्रांच्या जोड्या जुळवण्यास सांगावे.

CG – 3
C – 3.1
LO 03AE66

## वेशभूषा

आपण सर्व जण विविध प्रकारची वेशभूषा करतो. महाराष्ट्रातील स्त्रिया व पुरुष हे विविध प्रकारचे पोषाख घालून सण समारंभात नृत्य करतात.

**चित्रातील वेशभूषा पाहून त्यातील नृत्य प्रकार ओळखा. त्याचे दोन ते तीन वाक्यांत वर्णन लिहा.**



नृत्याचे नाव –



नृत्याचे नाव –

## माझी कृती

१) परिसरातील स्थानिक नृत्य प्रकाराचे निरीक्षण करून त्यासाठी लागणाऱ्या वेशभूषा, साहित्याची व वाद्यांची यादी तयार करा.

| नृत्य प्रकार | वेशभूषा | साहित्य | वाद्य |
|---|---|---|---|
| ....................... | ....................... | ....................... | ....................... |
| ....................... | ....................... | ....................... | ....................... |
| ....................... | ....................... | ....................... | ....................... |
| ....................... | ....................... | ....................... | ....................... |

- सभोवतालच्या परिसरातील वाद्यांवर चर्चा घ्यावी व पाहिलेल्या वाद्यांच्या नावांची यादी तयार करण्यास सांगावी.
- स्थानिक नृत्य प्रकार पाहून त्यातील वेशभूषेचे निरीक्षण करण्यास सांगावे व लागणाऱ्या साहित्यांची व वाद्यांची यादी तयार करण्यास सांगावे.

CG – 3
C – 3.1
LO 03AE67/68

# १६. कला संस्कृती

आपल्या परिसरातील स्थानिक सण–उत्सव व परंपरा यातून आपली कलासंस्कृती दिसून येते.

आपण विविध सण, समारंभ आणि उत्सव साजरे करतो. त्यात आवडीने सहभागी होतो. खाली काही सणांची व उत्सवांची चित्रे दिली आहेत. ती पहा व त्यापैकी कोणते सण व उत्सव तुम्ही साजरे करता हे आपल्या मित्रांना सांगा.

अशा प्रकारे आपल्या परिसरात साजऱ्या होणाऱ्या इतर सणसमारंभांचे वर्णन तुम्ही आपल्या गटात किंवा वर्गात करा.

**परिसरातील सण–उत्सव**














- परिसरात साजऱ्या होणाऱ्या सणसमारंभ व उत्सवांचे निरीक्षण करण्यासाठी मार्गदर्शन करावे.
- गटात सणसमारंभांचे वर्णन करण्यास प्रोत्साहन द्यावे.
- सर्वांना संधी उपलब्ध करून दयावी,

CG –4
C–.2
Lo– 03AE24

आपल्या कलासंस्कृतीचा सभोवतालच्या पर्यावरणाशी संबंध असतो. प्रत्येक भौगोलिक रचनेनुसार सण–उत्सव व परंपरा यामध्ये थोडाफार बदल होत असतो. जसे बैलपोळा हा काही भागांत बेंदूर, काही भागांत श्रावण पोळा, काही भागांत भाद्रपद पोळा या नावाने प्रसिद्ध आहे.

आपण पुढील काही प्रश्नांवर आपल्या वर्गातील मित्रांबरोबर, शिक्षकांसोबत चर्चा करा.

- तुमच्या परिसरात कोणकोणते सणउत्सव साजरे केले जातात ?
- या सण– उत्सवातील कोणत्या परंपरा तुम्हांला आवडतात ?
- तुमच्या नातेवाईकांच्या गावाला हे सण – उत्सव काही वेगळ्या पद्धतीने साजरे केले जातात का ?

### सणउत्सवातील गाणी व नृत्य

आपल्या राज्यात खूप सुंदर सणउत्सव साजरे केले जातात. उत्सवात लोक एकत्र येतात, गाणी गातात, नृत्य करतात आणि आनंदाने सण साजरे करतात. सणांमुळे आपल्याला आनंद मिळतो, सण उत्सवांमधून आपली एकता आणि संस्कृती यांची ओळख होते. सण उत्सवात सामूहिकपणे गाणी गाऊन नृत्य केले जाते.



गणेशोत्सव



नागपंचमी



होळी



ग्रामोत्सव/जत्रा

याशिवाय तुमच्या परिसरात कोणकोणत्या प्रसंगी पारंपारिक गाणी गाऊन नृत्य केले जाते याची यादी तयार करा.

- परिसरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सण उत्सव व समारंभांविषयी चर्चा करण्यास सांगावी.
- परिसरात कोणते उत्सव गाणी गाऊन नृत्य केले जाते यावर चर्चा करण्यास सांगावे.

CG - C- Lo- 03AE61/71

## स्थानिक कलाप्रकार व कलाकार

ज्याप्रमाणे भौगोलिक प्रदेशानुसार सण-उत्सव हे साजरे करण्याच्या पद्धतीत बदल होत असतो. तसेच प्रत्येक भौगोलिक प्रदेशानुसार कलाप्रकार देखील बदलत जातात.

पुढे काही कलाप्रकारांची व कलाकारांची चित्रे दिली आहे. तुमच्या परिसरात त्यापैकी कोणते कलाप्रकार सादर केले जातात त्यावर बरोबरची खूण करा.



चित्रकला - चित्रकार ☐



वादन - वादक ☐



पोवाडा- शाहीर ☐



भारूड - भारूडकार ☐

- विविध कलाप्रकार व त्यासंबंधित कलाकारांची माहिती द्यावी.
- परिसरातील इतर कलाकार व संबधित कलाकारांविषयी चर्चा करण्यास सांगावे.

CG -4
C- 4.1,04.2
Lo- 03AE
42/60/61

याशिवाय तुमच्या परिसरात असणाऱ्या इतर कलाप्रकारांची व त्यासंबंधित कलाकारांची यादी तयार करा.

| कलाप्रकार | कलाकार |
|---|---|
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |
| ................................ | ................................ |

## स्थानिक कलाकाराशी संवाद

आपल्या परिसरात अनेक स्थानिक कला प्रकार आढळतात. उदा. नृत्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला. या कला सादर करणाऱ्या व्यक्तीला कलाकार म्हणतात. कलाकार आपल्या कलेतून लोकांचे मनोरंजन करतात आणि संस्कृती जपतात.आपल्या परिसरातील कलाकाराचे सादरीकरण लक्षपूर्वक पहा. त्या कलाकाराशी संवाद साधण्यासाठी पुढे दिलेल्या प्रश्नांचा आधार घ्या. तुमच्या आवडीनुसार तुम्ही अधिकचे प्रश्नदेखील विचारू शकता.

१) तुमचे  नाव काय?

२) तुमच्या घरात किती लोक राहतात ?

३) तुम्ही ही कला कशी शिकला ?

४) ही कला तुम्हांला कोणी शिकवली?

५) तुम्ही ही कला किती वर्षांपासून सादर करत आहात ?

६) तुमच्या घरात ही कला इतर कोणी शिकली आहे का?

७) तुम्ही ही कला सादर करण्यासाठी कोणकोणते साहित्य लागते?

८) ही कला सादर करण्यासाठी तुम्हांला कोणाकोणाची मदत लागते?

९) या कला क्षेत्रात तुम्ही कोणाला आदर्श मानता?

१०) आम्हांला ही कला शिकण्याची संधी कशी मिळेल?

कलाकारांशी प्रश्नावलीच्या माध्यमातून केलेल्या संवाद प्रश्नोत्तर स्वरूपात लिहा आणि शिक्षकांना दाखवा.

- परिसरातील कलाप्रकार व कलाकारांची यादी करण्यास सांगावे.
- स्थानिक कलाकाराच्या कार्यक्षेत्रास भेट आयोजित करावी किंवा कलाकारास कला सादर करण्यासाठी शाळेत बोलवावे. मुलाखतीसाठी आवश्यक प्रश्न तयार करावेत.

CG -4
C- 4.1,4.2
Lo- 03AE
25/42/60

## माझी कृती

१) आपल्या परिसरात साजऱ्या होणाऱ्या तुमच्या आवडत्या सण उत्सवांविषयी चित्र चिकटवून थोडक्यात माहिती लिहा.

२) आपल्या परिसरातील एखाद्या कलाकाराशी संवाद साधून त्यांची माहिती जमा करा व लिहा.

३) आपल्या परिसरातील सण उत्सव व समारंभाच्या वेळी गायल्या जाणाऱ्या कोणत्याही दोन पारंपरिक गीतांचे संकलन करून चालीसहित सादर करा.

४) आपल्या परिसरातील कोणत्याही एका कलाप्रकाराची माहिती संकलित करून प्रकल्प सादर करा.

५) आपल्या परिसरातील स्थानिक नृत्याबद्दल सचित्र माहिती गोळा करा व त्यातील सहज सोप्या हालचालींचे सादरीकरण करा.

## विशेष नोंदी

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई–बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

कलाशिक्षण इयत्ता तिसरी (मराठी माध्यम)

**(विनामूल्य वितरणासाठी)**

समग्र शिक्षा
Samagra Shiksha



कलाशिक्षण इयत्ता तिसरी (मराठी माध्यम)